⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SATURDAY 17 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-47 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-10 ●PRICE-5




## महत्त्वाची बातमी

### मी पक्ष स्थापन केला नाही : प्रशांत किशोर

आधुनिक केसरी न्यूज

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी गेल्या महिन्यात भाजपाची साथ सोडत राजदसोबत सत्ता स्थापन केली. भाजपावर पक्ष फोडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करून नितीश कुमारांनी भाजपाला राज्यातील सत्तेबाहेर ठेवलं. नितीश कुमार बिहारचे मुख्यमंत्री तर तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री झाले. नितीश कुमार यांनी घेतलेल्या निर्णयावरून राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर टीका करत होते. त्यानंतर बुधवारी प्रशांत किशोर यांनी नितीशकुमार यादव यांची भेट घेत बंद दाराआड चर्चा केली. त्यामुळे प्रशांत किशोर पुन्हा विरोधी पक्षासाठी काम करणार असल्याची चर्चा आहे. तुमची नजर २०२४ साली तुम्ही बिहारच्या मुख्यमंत्रीपदावर आहे का? लोकसभा निवडणुकीवर, असा सवाल एका वृत्तवाहिनीने प्रशांत किशोर यांनी विचारला. त्यावर "मी कोणताही पक्ष स्थापन केला नाही आहे. फक्त जनसुराज्य नावाचे अभियान चालवत आहे. ज्याच्यामाध्यमातून बिहारमधील लोकांचे प्रश्न मी समजून घेत आहे." "लोकांसोबत चर्चा करून पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेणार आहे. जर पक्ष स्थापन केला तर त्याचा भाग अथवा नेता सुद्धा होणार नाही.

# भारताला 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवणार

## शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले संबोधित

आधुनिक केसरी न्यूज

**समरकंद : झबेकिस्तानमधील समरकंद येथे सुरू असलेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन शिखर परिषदेत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. उझबेकिस्तानमधील समरकंद येथे सुरू असलेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन) शिखर परिषदेत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांनी भारताला लवकरच 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवणार असल्याचे म्हटले आहे.**



"जग कोविड-१९ चा सामना करत आहे. कोविड आणि युक्रेनच्या संकटामुळे जागतिक पातळीवर आयात-निर्यातीत अनेक अडचणी निर्माण झाल्यात आहेत. आम्हाला भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनवायचे आहे. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आज भारतात ७० हजारांहून अधिक स्टार्ट-अप सुरू झाले आहेत. आम्ही विकासावर आमचे लक्ष केंद्रीत करत आहोत. मला आनंद आहे की, भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

दरम्यान, यावेळी पंतप्रधान मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि इतर नेत्यांमध्ये प्रादेशिक सुरक्षा आणि व्यापारवाढीवर चर्चा झाली. तत्पूर्वी उझबेकिस्तानचे पंतप्रधान अब्दुल्ला आरिफॉव्ह आणि समरकंदचे राज्यपाल यांनी पंतप्रधान मोदींचे समरकंदमध्ये स्वागत केले. समरकंदमध्ये होणाऱ्या शिखर परिषदेचे दोन सत्र होणार आहेत. पहिल्या सत्रात केवळ शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनचे सदस्य सहभागी होणार आहेत. तर दुसऱ्या सत्रामध्ये इतर देशांनाही निमंत्रित करण्यात येणार आहे.

## चर्चेतली बातमी

### चिनी लोन ॲप्सना 'ईडी'चा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयने (ईडी) शुक्रवारी (१६ सप्टेंबर) चिनी लोन ॲप्सवर मोठी कारवाई केली आहे. ईडीने सांगितले की, या आठवड्यात छापेमारीनंतर ईझबझ, 'रॅझॉरपे', 'पेटीएम' आणि 'कॅशफ्री'च्या आभासी(वर्चुअल) खात्यांद्वारे जमा केलेले ४६.६७ कोटी रुपये जप्त करण्यात आले आहेत.

ईडीने माहिती दिली की, ईझबझ प्रायव्हेट लिमिटेड पुणे यांच्याकडील एकूण ३३.३६ कोटी, कॅशफ्री पेमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बंगळुरू – १.२८ कोटी, रॅझॉरपे सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड, बंगळुरू – ८.२१ कोटी आणि पेटीएम पेमेंट्स सर्व्हिसेस लिमिटेड नवी दिल्ली – १.११ कोटी. ५०० रुपये जप्त करण्यात आले आहेत. १४ सप्टेंबर रोजी दिल्ली, मुंबई, गाझियाबाद, लखनऊ आणि गया येथे या प्रकरणाशी संबंधित अनेक ठिकाणांवर छापे टाकण्यात आले होते.

तपासासंदर्भात दिल्ली, गुरुग्राम, मुंबई, पुणे, चेन्नई, हैदराबाद, जयपूर, जोधपूर आणि बेंगळुरू येथील बँका आणि पेमेंट गेटवेच्या १६ ठिकाणांचाही यात समावेश आहे.

# लम्पी आजाराची लागण झालेल्या जनावरांसाठी क्वारंटाईन सेंटर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील ज्या भागांमध्ये जनावरांमध्ये लम्पी आजाराची लागण मोठ्याप्रमाणावर झाली आहे, त्याठिकाणी क्वारंटाईन सेंटर (विलगीकरण कक्ष) उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून करण्यात आली आहे. उत्तर भारतात लम्पीच्या साथीमुळे मोठ्याप्रमाणावर गुरे दगावली आहेत. देशभरात आतापर्यंत लम्पी आजारामुळे ७० हजार जनावरांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रातील काही भागांमध्ये लम्पीचा प्रसार वेगाने होत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता बाधित जनावरांसाठी क्वारंटाईन सेंटर्स उभारण्याची घोषणा केली आहे.

एकनाथ शिंदे यांनी याबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देताना सांगितले की, लम्पी आजाराचा प्रभाव आणखी वाढू नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार क्वारंटाईन सेंटरमध्ये ठेवून लम्पीची लागण झालेल्या जनावरांना आयसोलेट केले जाईल. त्यासंदर्भातील सूचना विभागीय आयुक्त आणि जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच राज्यात लम्पी आजाराचा सामना करण्यासाठी लशींचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, लम्पी स्कीन संदर्भात टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. जनावरांमध्ये रोगाची वाढती संख्या पाहाता आणि पुढील धोका ओळखून शासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. लम्पी आजारामुळे मृत पावलेल्या जनावरांचा मोबदला त्या शेतकऱ्यांना देणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. लम्पी रोग राज्यातील जवळपास २२ जिल्ह्यांमध्ये पसरलेला आहे. ज्या ठिकाणी लम्पी रोगाची लागण झालेली आहे त्या ठिकाणाहून पाच किमीच्या परिघात सर्व जनावरांचं लसीकरण केले जाईल.

### लम्पी आजारामुळे गायीचे दूध सुरक्षित आहे का?

लम्पी रोग पशुंकडून माणसांपर्यंत पोहोचत नाही. पशुंकडून तो माणसांना होत नाही, अशी माहिती आयव्हीआरआयचे संयुक्त संचालक अशोक कुमार मोहंती यांनी दिली. लम्पी बाधित गायींचं दूध पिता येऊ शकतं. दूध व्यवस्थित उकळून घ्यावं. लम्पीमुळे दुधाच्या गुणवत्तेवर कोणताही परिणाम होत नाही, असं मोहंती म्हणाले. लम्पीमुळे स्थानिक स्तरावरील दूध उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. लम्पीचं गांभीर्य पशुच्या रोगप्रतिकारशक्तीवर अवलंबून असतं. लम्पीची लागण झाल्यानंतर जनावरं अशक्त होतात. ताप आणि अन्य लक्षणांचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. लम्पीचा परिणाम दूध उत्पादनावर होऊ शकतो, असे मोहंती यांनी सांगितले.



# समुद्रात बुडणाऱ्या 19 जणांना वाचविले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** रत्नागिरी किनाऱ्यापासून सुमारे 41 मैल पश्चिमेला बुडत असलेल्या जहाजातील 19 जणांना वाचवण्यात भारतीय तटरक्षक दलाला मोठे यश मिळाले आहे. भारतीय तटरक्षक दलाने 18 भारतीय आणि 01 इथिओपियन मास्टरसह 19 जणांना मोटार टँकर जहाजातून यशस्वीरित्या वाचवले.

रत्नागिरी किनाऱ्यापासून सुमारे 41 मैल पश्चिमेला सकाळी 9 वाजून 23 मिनिटाला जहाज बुडत असल्याची माहिती मिळाली. हे जहाज यूएईच्या खोर फक्कन येथून न्यू मंगलोरला जात होते. जहाजातून मदतीचा कॉल मिळाल्यानंतर काही मिनिटांतच एमआरसीसी मुंबई कामाला लागली. ICGS सुजीत आणि ICGS अपूर्व या परिसरात आणि परिसरात गस्त घालणारी दोन तटरक्षक जहाजे अपघातग्रस्त जहाजाकडे वळवण्यात आली. परिसरातील इतर व्यापारी जहाजांना सतर्क करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सुरक्षा नेट आणि सूचना देण्यात आली. तसेच सीजी प्रगत हेलिकॉप्टर या ऑपरेशन दरम्यान तैनात करण्यात आले.

ॲस्फाल्ट बिटुमेन 3911 एमटी वाहून नेणाऱ्या जहाज सकाळी नऊच्या दरम्यान अचानक बुडत असल्याचे जहाजावरील क्रू मेंबर्सला निदर्शनास आले. जहाज पूर्ण बुडण्याची शक्यता असल्याचे पाहून क्रू ने जहाज सोडून दिले. त्याचवेळी तटरक्षक दलाकडून योग्य पद्धतीने बचाव कार्य करून या जहाजावरील 19 जणांची सुखरुप सुटका केली आहे. त्यांना आता सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. सर्व कर्मचारी सुरक्षित असून सुरक्षेसाठी बोट किनाऱ्यावर आणली जात आहे. संकटाच्या हाकेला प्रतिसाद देण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाची धीरगंभीरता, तत्परता आणि व्यावसायिकता यामुळे आतापर्यंत 11 हजाराहून अधिक लोकांचे प्राण वाचले आहेत

सागरी तटरक्षक दल म्हणजेच भारताच्या सागरी किनाऱ्याचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी स्थापन केलेलं लष्करी दल. या तटरक्षक दलाचे मुख्य कार्य म्हणजे सागरी किनाऱ्यावर अनधिकृत किंवा अनियमित असे काही आढळले तर त्यावर तात्काळ योग्य ती कारवाई करणे असे आहे.

# अहमदाबाद-मुंबई प्रवास सुस्साट... वंदे भारत नव्या रूपात

आधुनिक केसरी न्यूज


मुंबई : रेल्वेकडून ३० सप्टेंबर रोजी सेमी हाय स्पीड ट्रेन वंदे भारतचं अपग्रेडेड वर्जन वंदे भारत २ लाँच करण्यात येणार आहे. नवी वंदे भारत २ ट्रेन सध्याच्या वंदे भारत ट्रेनहून अनेक गोष्टींबाबत अपग्रेड आहे. या ट्रेनला ३० सप्टेंबर रोजी अहमदाबादहून हिरवा झेंडा दाखवला जाईल आणि त्यानंतर ती मुंबईसाठी रवाना होणार आहे. ही ट्रेन मुंबई ते अहमदाबाद दरम्यान धावणार आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, हाय स्पीड वंदे भारत २ आपल्या जुन्या ट्रेनच्या तुलनेत ५२ सेकंदात १०० किमी ताशी वेगाने धावेल. बुलेट ट्रेनपेक्षाही हा स्पीड अधिक आहे.

बुलेट ट्रेनला हा स्पीड मिळवण्यासाठी ५४.६ सेकंद लागतात. नवी वंदे भारत मुंबई ते अहमदाबाद दरम्यान दोन स्टेशन्स सूरत आणि वडोदरा इथे थांबेल. यामुळे दोन आर्थिक शहरांमधील प्रवासाचा वेळ कमी होईल. वंदे भारतने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना शताब्दी एक्सप्रेस ट्रेनच्या मूळ भाड्याच्या १.४ पट अधिक पैसे भरावे लागणार आहेत. त्याशिवाय ५ टक्के जीएसटीदेखील भरावा लागेल. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई ते अहमदाबाद चालणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसमध्ये एक्झिक्यूटिव्ह क्लासमधील प्रवाशांसाठी २३४९ रुपये इतकं बेस फेअर असेल. तर चेअर कारसाठीचं भाडं ११४४ रुपये असेल. या किमतीत जीएसटी सामिल नाही. वंदे भारतच्या एक्झिक्यूटिव्ह क्लासचं अहमदाबाद ते सूरतचं भाडं १३१२ रुपये असेल, तर चेअर कारसाठी ६३४ रुपये असेल.

तर एक्झिक्यूटिव्ह क्लासमध्ये सूरत ते मुंबईसाठीचं भाडं १५२२ रुपये आणि चेअर कारचं भाडं ७३९ रुपये असेल. आयसीएफ चेन्नईकडून तयार करण्यात आलेल्या वंदे भारत ट्रेनला अधिकतर १८० किमी ताशी स्पीड देण्यात आला आहे, पण सध्या रेल्वे ट्रॅक १३० किमी ताशीहून अधिक स्पीड सपोर्ट करत नाही. वंदे भारत ट्रेनची १२ ऑगस्ट रोजी चेन्नईतील इंटिग्रल कोच फॅक्ट्रीमधून सुरुवात करण्यात आली होती. पहिल्या वंदे भारत ट्रेनमध्ये सीट, शौचालयसह इतर अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता.



वंदे भारत एक्सप्रेसने स्पीडमध्ये नवा रेकॉर्ड केला आहे. ट्रायल रनवेळी विविध ठिकाणी वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनचा स्पीड १८० किमी ताशी इतका होता. वंदे भारत ट्रेन संपूर्ण स्वदेशी निर्मित ट्रेन आहे. ही सेमी हाय-स्पीड ट्रेन असून यात ऑटोमेटिक दरवाजे आणि एसी चेअर कार आहे. या चेअर १८० डिग्रीपर्यंत रोटेट करता येऊ शकतात. या ट्रेनला खास ब्रेकिंग सिस्टम लावण्यात आलं आहे, ज्यामुळे विजेचा वापर कमी होतो. ट्रेनमध्ये अनेक उपकरणं खाली लावण्यात आली आहेत, जेणेकरुन केबिनमध्ये प्रवाशांना अधिक जागा मिळू शकेल.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# जंगलतोडीचे भीषण दुष्परिणाम

**एक लढा असाही ( भाग-2 )**

वाचकहो, मागील पहिल्या भागात आपण पाहिले की हिमालयातील विशेषतः उत्तराखंडातील समृद्ध जंगले इंग्रजांनी कशा प्रकारे नष्ट करण्यास प्रारंभ केला. पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर सुद्धा ही जंगलतोड थांबली नाही. तेथील वनखात्याने, सरकारने ब्रिटिशांचाच वारसा पुढे चालवला. आपल्या हाताने आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेऊ लागलो. ब्रिटिशांनी चीड, देवदार, साग, साल आदी वृक्षांच्या लागवडीला आणि वृक्षतोडीलाही उत्तेजन दिले कारण ते त्यांच्या व्यावसायिक उपयोगाचे होते. आम्हालाही तेच वृक्ष महत्वाचे वाटले. पण जंगलात राहणाऱ्या स्थानिक आदिवासी आणि पहाडी लोकांच्या गरजा भागवणारे पमनी, बांज, बुरांझ यासारख्या रुंदपर्णी जीवनदायी वृक्षांकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. जंगले साफ करण्यासाठी या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर कत्तल झाली. या वृक्षांवर रोजीरोटी अवलंबून असणारा स्थानिक गरीब माणूस आपल्या अन्नपाण्याला मुकला. या प्रचंड जंगलतोडीने स्थानिक लोकांचा रोजगार हिरावून घेतला. अनेकांना स्थलांतर करण्याची वेळ आली. पोटाला अन्न, हाताला काम उरले नाही. आपल्या कच्च्याबच्च्यांना घेऊन अनेकांना शहरांचा रस्ता धरावा लागला. जंगलचा राजा असणारा हा पहाडी माणूस कुठेतरी रोजंदारी करू लागला, राखण करू लागला, हॉटेलात कपबशा विसळण्याची वेळ त्याच्यावर आली. लहान मुले हॉटेलात, चहाच्या टपऱ्यांवर कामे करू लागली. स्त्रिया बांधकाम आदी ठिकाणी कष्टाची कामे करू लागल्या.

कोणी केली ही जंगले साफ ? आमच्याच माणसांनी. कधी शेतीसाठी तर कधी व्यापारी फायद्यासाठी. ज्या वृक्षांना वाढण्यासाठी अनेक वर्षे लागतात ते डौलदार वृक्ष केवळ पाच दहा रुपयांसाठी आमचा स्थानिक माणूस गरजेपोटी तोडून आडवे करू लागला. अनेक वर्षांचे वाढलेले, निसर्ग, प्राणी संपत्तीने समृद्ध असलेले आमचे हिरवेगार जंगल केवळ काही दिवसात, काही तासात आडवे होऊ लागले. वृक्षांची हत्या होऊन त्यांचे निर्जीव कलेवर जागोजागी दिसू लागले.

धरतीच्या या निष्पाप लेकरांचा शाप पुढे मानवाला भोवल्याशिवाय राहिला नाही. पहाडात राहणारे लोक जंगल उतारांवर शेती करत. पण त्यासाठी झाडे तोडण्याचे प्रमाण सुरुवातीला मर्यादित होते पण या भागात जसजसा आपल्या नागर संस्कृतीचा प्रवेश झाला, तसतसा इथेही निसर्गाचा विध्वंस व्हायला सुरुवात झाली. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## आकर्षणाचा सिद्धांत


आधुनिक केसरी

जसे भूतकाळाचे भूत आपल्या मानगुटीवर बसलेले असते, तसेच काहीसे भविष्यातील विचाररूपी राक्षसदेखील आपल्या हात धुवून मागे लागलेला असतो. अनेकदा भूतकाळातल्या आठवणी आपल्याला स्वस्थ बसू देत नाहीत; तर काहीवेळा भविष्याची चिंता, काळजी आपल्याला काही सुचू देत नाही. कितीही ठरवले आणि काहीही केले, तरीही आपण मात्र ह्याच दुष्ट्चाक्रांत अडकतो. गेलेला काल आपल्याला विसरणेच संयुक्तिक ठरते आणि येणाऱ्या उद्याच्या चिंतेत व्यथित न होता आजचा वर्तमानातला दिवस आनंदात व्यतीत करणे अधिक महत्वाचे, आवश्यक, जरुरीचे आणि गरजेचे असते. गेलेला काल आपल्या हातातून निसटून गेलेला असतो आणि उद्याची प्रत्येक घडोमोड ही येणारा काळ ठरवतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अर्थात, उद्याचा येणारा प्रत्येक क्षण विलक्षण कसा करता येईल, त्याची सुरुवातच सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहाराने कशी होईल, हे आपण अभ्यासपूर्ण वैचारिक मंथनातून ठरवू शकतो आणि त्यानुरूप कार्यकृती करू शकतो. ह्याठिकाणी "आकर्षणाचा सिद्धांत" (लॉ ऑफ अॅट्रॅक्शन) ह्या सिद्ध आणि स्पष्ट झालेल्या शास्त्रीय प्रयोगाचा वापर उपयुक्त ठरू शकतो. थोडक्यात, आपल्या आंतरिक इच्छाशक्तीच्या जोरावर आपण आपली कार्यसिद्धी करू शकतो, त्यांत भरघोस यशही संपादन करू शकतो, अशा दृष्टीकोनातून "आकर्षणाचा सिद्धांत" आपल्या सुखी, आनंदी आणि मनःशांती देऊ करणाऱ्या उद्यासाठी आपण आजपासून रोजच वापरू शकतो. आपल्या भविष्यातील योग हे नशिबावर नाही तर आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार यांवर अवलंबून, आधारलेले असतात. त्यासाठी वर्तमानातील आपण प्रत्येक क्षण आनंदाने जगावा.




आधुनिक केसरी

## होई रममान | चित्त माझे ||

भक्ती विना भाव | कारण पापासी ||
बुडवी जनासी | दांभिक तो ||१||

भक्तीचा महिमा | जाणेल जो कोणी ||
तोच संत जनी | नांदताहे ||२||

भक्तीचा भूकेला | परब्रम्ह दाता ||
वर्णू काय कथा | भक्ती मुक्ती ||३||

भक्तीच्या उदरी | ज्ञानामृत फळ ||
चैतन्य रसाळ | मोक्ष देई ||४||

भक्तीचा महिमा | सांगे संतजन ||
होई रममान | चित्त माझे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**जगदम्ब नमस्तुभ्यं ज्योतिरूपाय ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं सुरारिष्टविनाशिनि ।। ५ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या ज्योतीरूपाला नमस्कार असो. देवांच्या अरीष्टांचा नाश करणारे, जगदंबे तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीचक्राङ्कितमातृके।**
**पतितानां च दीनानामाधारमूर्तये नमः ।।६।।**

जगदंबिके, श्रीचक्रावर अधिष्ठित मातृके, तुला नमस्कार असो. पतितांची दीनांची आधारमूर्ती अशा तुला नमस्कार असो.

# भगवंताकडे मन लावावे व देह प्रारब्धावर सोपवावा



आधुनिक केसरी

खरोखर, प्रारब्धाचे भोग कुणालाही टळत नाहीत. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो, मनाशी नाही. देहास सुखदुःख प्रारब्धाने मिळते. दुःख कोणालाही नको आहे, पण ते येते. सुखाचेही तसेच आहे. प्रारब्ध म्हणजे कृतकर्माचे फळ. हे चांगले वा वाईट असू शकते. सुखाचे भोग आले तर माणसाला काही वाटत नाही, पण दुःखाचे प्रसंग आले की मनुष्य म्हणतो, "मी देवाचे एवढे केले, मी अमक्या अमक्या सत्पुरुषाचा आहे, मग मला असे दुःख का भोगावे लागते ?" पण त्याला हे समजत नाही की हा सर्व आपल्याच कर्माचा परिणाम आहे. त्याला देव किंवा संत काय करील ? समजा, आपल्याला काही पैशाची जरूरी आहे आणि आपल्या ओळखीचा माणूस किंवा अगदी जवळचा नातेवाईक एखाद्या मोठ्या बँकेचा मनेजर आहे; पण आपल्या स्वतःच्या नावावर बँकेत जर पैसे नसले तर तो काहीही करू शकत नाही. फारच झाले तर तो आपल्या स्वतःच्या खिशातून काही पैसे देईल. त्याचप्रमाणे, आपल्या प्रारब्धात जर सुख नसेल तर ते कुठून मिळणार ? संत फार तर जरूरीप्रमाणे आपले दुःख स्वतः सोसून आपला भार हलका करील इतकेच. म्हणून आपल्या प्रारब्धाने आलेल्या बऱ्यावाईट गोष्टी देहाने भोगाव्या आणि मनाने भगवंताचे स्मरण ठेवावे. खरा भक्त हा देहाला विसरलेला असल्याने देहाचे भोग भोगणे वा न भोगणे या दोन्हीची त्याला फिकीर नसते. म्हणून तो भोग टाळत नाही.

मनुष्याच्या देहाच्या अवयवात जसा कमीजास्तपणा असतो, त्याचप्रमाणे मनुष्याचे विकार आणि गुण पूर्वजन्माच्या संस्काराप्रमाणे, म्हणजेच प्रारब्धाप्रमाणे, कमीजास्त प्रमाणात येतात. आपल्या देहाला होणारे भोग आपल्या कर्माचेच फळ असते, पण ते अमुक कर्माचे फळ आहे असे कळत नसल्यामुळे आपण त्याला प्रारब्ध असे नाव देतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्या सर्व गोष्टी प्रारब्धानेच चालतात. आपल्याला येणाऱ्या आपत्ती आपल्या प्रारब्धाच्या असतात; त्या भगवंताच्या नसतात; त्या पाहुण्यासारख्या असतात. त्या जशा येतात तशा जातात देखील. आपण होऊन त्या आणू नयेत, आणि प्रारब्धाने आल्या तर त्यांना घाबरू नये. प्रारब्धाची आणि ग्रहांची गती देहापर्यंतच आहे, मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही. जो संताची किंवा सद्गुरूची आज्ञा पाळतो, त्याचे प्रारब्ध हे प्रारब्धरूपाने राहात नाही. भगवंताच्या अनुसंधानाची सवय लावून घ्यावी, म्हणजे आपण प्रारब्धावर विजय मिळवल्यासारखेच आहे. आजचे बोधवचन : भगवंताचा जो झाला । त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ॥

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# ।। तारक मंत्र ।।

आधुनिक केसरी

ह्या दोन शब्दातच त्याचा अर्थ आहे ...जो आजाराने त्रासलेला आहे ,जो चिंतेने ग्रासलेला आहे ...ह्यांना तारण्यासाठी नेहमी स्वामी काय तरी उपाय करताच ...स्वामि नी आपल्याला हि अनमोल भेट दिली आहे तारक मंत्र देऊन...

तारक मंत्रात इतकी प्रचंड शक्ती आहे कि मी ,तुम्ही आणि आपण कोणीच विचारही करू शकत नाही ...शेवटही ती स्वामींची शक्ती ...अगम्य शक्ती ...हा मंत्र तुम्ही म्हणायला सुरवात करा आणि बघा तुमच्या शरीरात एक मानसिक बळ येते ते ..

आणि हो जर हा मंत्र तुम्ही हळू हळू म्हटला तर खूपच बळ ,शक्ती अंगात संचारते हा माझा आणि आपल्याच स्वामी भक्तांचा अनुभव आहेच ...या मंत्रात एक कडवे आहे कि "अतर्क्य अवधूत हे स्मरण गामी ,अशक्य हि शक्य करतील स्वामी ,,,"फक्त आणि फक्त ह्या वचनावर स्वामींवर विश्वास ठेवा आणि बघा ह्या जगातील कितीही मोठी गोष्ट असून द्या ...

ती तुम्ही सहजच मिळवाल आणि नंतर तुमचे आजूबाजूचे मित्र म्हणा किवा नातेवाईक म्हणतील असे तू काय करतो रे कि तुझी प्रगती



एकदम झपाट्याने होते ती ...तेव्हा मनातल्या मनात स्वतः लाच बोला कि "माझ्या मागे माझे गुरु स्वामी समर्थ आहेत ,ह्या जगाचा जो एकाच मालक आहे. ह्या जगात झाडांची पाने सुद्धा जो हलवतो ,सर्वांचे रक्षण करतो ... असे स्वामी महाराज माझ्या मागे होते ...आहेत ...आणि राहणारच ...तरी मी एक परत विनंती करतो कि सर्व जणानी हा तारक मंत्र म्हणायला सुरवात करावी ...हा म्हणत असताना एका वाटीत पाणी घेऊन, अग्गरबत्ती लाऊन त्याची राख त्या वाटीत पडेल अशी ठेवा ...आणि मंत्र झाल्यावर घरातल्या सर्वांनी ते तीर्थ म्हणून घ्या आणि बघा अनुभव स्वत च अनुभवून ...स्वामी सद्देव आपल्या पाठीशी असतात पण आपणच त्यांना ओळखू शकत नाही ...

कुठल्या ना कुठल्या मार्गाने स्वामी आपल्याबरोबर नेहमी असतात फक्त आपण हे लक्ष्यात आणले पाहिजे कि स्वामी सदैव माझ्या बरोबर आहेत ... ते म्हणतात ना "भगवंताला.. माझ्या, आपल्या... स्वामिना बघायला तशी दृष्टि असावी लागते "...

श्री स्वामी समर्थ तारक मंत्र

निःशंक होई रे मना।
निर्भय होई रे मना रे।
प्रचंड स्वामीबळ पाठीशी नित्य आहे रे मना।
अतर्क्य अवधुत हे स्मरणगामी।
अशक्य ही शक्य करतील स्वामी ॥१॥
जिथे स्वामीचरण तिथे न्युन काय।
स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय।
आज्ञेविन काळ ना नेई त्याला।
परलोकीही ना भिती तयाला ॥२॥
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।
उगाची भितोसी भय हे पळु दे।
वसे अंतरी स्वामी शक्ती कळु दे।
जगी जन्ममृत्यु असे खेळ ज्यांचा।
नको घाबरु तु असे बाळ त्यांचा ॥३॥
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।
खरा होई जागा श्रद्धेसहीत।
कसा होशी त्याविण तु स्वामीभक्त।
आठव कितीदा दिली त्यांनीच साथ।
नको डगमगु स्वामी देतील हात ॥४॥
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।
विभुती नमन नाम ध्यानादी तीर्थ।
स्वामीच ह्या पंचप्राणामृतात।
हे तीर्थ घे आठवी रे प्रचिती।
न सोडी कदा स्वामी ज्या घेई हाती ॥५॥
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।
श्री स्वामी चरणार विंदार्पणमस्तु

असा हा "श्री स्वामी समर्थ" तारक मंत्र प्रत्येकाने दररोज किमान तीन वेळा किंवा निदान एक वेळा तरी म्हणावा.

तारक मंत्र : गंभीर प्रसंगी तारक मंत्र म्हणत असताना एक अगरबत्ती लावावी व त्या अगरबत्तीची विभूती एका पेल्यातील पाण्यात पडू द्यावी. तारक मंत्र म्हणून झाल्यावर हे पाणी तीर्थ म्हणून प्राशन करावे तसेच घरातील इतरांनाही द्यावे.

# गुंगीकारक औषधाची विक्री करणाऱ्या इसमाला एल.सी.बी.ने केले अटक

**१४,३२० किमतीचा मुद्देमाल जप्त**

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका परीसरात सदर व्यक्तीचा शोध घेत असता धुळे महानगरपालिके शेजारील गल्लीमध्ये मिळालेल्या बातमीप्रमाणे फॅशन मोटार सायकल यावर दोन व्यक्ती एक औषधची प्लॅस्टिकची भरलेली गोणी व दोन पुठठा बॉक्स सह उभे दिसल्याने त्यांना ०८.३० वाजेच्या सुमारास ताब्यात घेतले.

स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम तौसिफ शाह सलिम शाह रा. ८० फुटी रोड धुळे हा त्याच्या साथीदारांसह त्याचे ताब्यातील हिरो होंडा कंपनीची पॅशन मोटार सायकल यावरून मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आणणाऱ्या गुंगीकारक औषधाच्या बाटल्यांची चोरटी विक्री करण्याच्या उद्येशाने धुळे महानगरपालिका, शिवाजी हायस्कुल परिसरात फिरत असल्याबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली सदर इसमाचा शोध घेवून नमुद बातमीची खात्री करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणे बाबत पो.नि. हेमंत पाटील यांनी पोसई योगेश राऊत व स्था . गु शाखेकडील पथकास आदेशीत केले. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स्थागुशा धुळे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे पथकाने धुळे महानगरपालिका परीसरात सदर व्यक्तीचा शोध घेत असता धुळे महानगरपालिके शेजारील गल्लीमध्ये मिळालेल्या बातमीप्रमाणे पैशन मोटार सायकल क्रमांक एम.एच. ३ ९ आर.डी. १९३९ यावर दोन इसम एक प्लॅस्टिकची भरलेली गोणी व दोन पुठठा बॉक्स सह उभे दिसल्याने त्यांना ०८.३० वाजेच्या सुमारास ताब्यात घेवून त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांची नावे १ ) तौसिफ शाह सलिम शाह वय २४ व्यवसाय मजुरी रा . रमजान बाबा नगर, उस्मानिया मशिद जवळ ८० फुटी रोड थुळे २) अतुल कन्हैयालाल राणे वय २३ व्यवसाय मजुरी रा . गांधी नगर , श्रीनाथ ३ सोसायटी , सपना पान सेंटर , सुरत ( गुजरात ) असे सांगितले त्यांचे ताब्यातील मो / सा वर ठेवलेली गोणी व पुठठा बॉक्सची तपासणी केली असता खालील नमुद किंमतीचा व वर्णनाचा गुंगीकारक औषधाच्या बाटल्या व गोळया मिळून आल्या .

एकुण ९४३२० / - रु . किंमतीचा मुद्येमाल वरील प्रमाणे मिळून आलेला मुझेमाल जप्त करून इसम नामे १ ) तौसिफ शाह सलिम शाह २ ) अतुल कन्हैयालाल राणे याचे विरुध्द पोकों / कमलेश सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून धुळे शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे. सदरची कारवाई प्रविणकुमार पाटील , पोलीस अधीक्षक, धुळे, प्रशांत बच्छाव , अपर पोलीस अधीक्षक धुळे ( अति. कार्यभार ) यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे पो.निरी . हेमंत पाटील, योगेश राऊत आदींनी केली



# लासूर प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या तीन महिन्यांपासून गोळ्या औषधांचा ठणठणाट



आपण वरिष्ठ कार्यलयास वेळोवेळी औषधंच्या तुटवड्याबाबत सांगून औषध व गोळ्यांची मागणी केली आहे मात्र त्यांठिकाणीच औषधंचा तुटवडा आहे त्यामुळे रुग्णांना अनेक समश्यांचा सामना करावा लागत आहे यामध्ये लहान मुलांचे कफ सिरफ, अँटॉबीओटीक गोळ्या, औषधी, फंगल इन्स्पेकशनचे मलम याचाही तुटवडा आहे आम्ही मागणी केली आहे लवकरच औषधी उपलब्ध होण्याची आशा आहे . -**डॉ . बापूसाहेब चाटे** ( वैद्यकीय अधिकारी )

दरम्यान अश्याच पद्धतीचा गोळ्या औषधी यांचा तुटवडा कोरोनो काळात झाला होता त्यावेळी वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक प्रितमकुमार मुथा व माजी उपसरपंच गणेश व्यवहारे यानी दोनवेळेस प्राथमिक आरोग्य केंद्राला तीन महिने पुरेल इतक्या परसिटीमोल टॅबलेट, कफ सिरफ आदीसह इतर गोळ्या औषधी मोफत दिल्या होत्या त्यांवर रुग्णांना तीन महिने गोळ्या औषधी यांची कमतरता भासली नव्हती .

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** मोठ्या घरचा पोकळ वासा अन वारा जातो भसाभसा अशी परिस्थिती लासूरच्या आरोग्य केंद्राची झाली आहे कारण आमदार प्रशांत बंब, माजी उपसभापती तथा उपसरपंच संपत छाजेड, शिवसेनेचे तालुकाप्रमुख दिनेश मूथा माजी सभापती संजय जैस्वाल,राष्ट्रवादीचे तालुकाकार्यअद्यक्ष सुनील पाखरे एम.आय.एम पक्षाचे तालुका उपाद्यक्ष अजित जाधव यांच्यासह शिवसेनेचे अनेक आमदार, खासदार,मंत्री यांच्याशी व विविध राजकीय पक्षातील मातब्बर पुढाऱ्यांशी जवळीक असलेल्या कार्यकर्त्यांह्या गावात आरोग्यसेवेचा बट्याबोळ..... गंगापूर तालुक्यातील सर्वात मोठे राजकीय सत्ताकेंद्र व बाजार पेठ असलेल्या लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्या केंद्रात गेल्या तीन महिन्यापासून औषधी व गोळ्यांचा तुटवाडा असून याकडे कुठलाही राजकीय पुढारी लक्ष देत नसल्याने ऐन व्हायरल इन्स्पेकशनच्या काळात लहान बालके,मुले, शालेय विद्यार्थी, आबाल वृद्धाचे आरोगय रामभरोसे. असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला आसपासचे जवळपास सत्तर ते ऐंशी गावातील रुग्ण दररोज उपचारासाठी भेट देतात त्यामुळे ओपिडीला रुग्णांची प्रचंड गर्दी असते व त्यामुळे दररोज औषधी व गोळ्या रुग्णांला दिल्या जातात त्यामुळे वारंवार औषधंचा ठणठणाट दवाखान्यात आहे त्यामुळे लवकरात लवकर औषधंचा पुरवठा करण्याची मागणी रुग्णांनातून होत आहे विशेष म्हणजे गंगापूरचे आमदार प्रशांत बंब,पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा उपसरपंच संपत छाजेड, शिवसेनेचे तालुकाप्रमुख दिनेश मूथा, माजी सभापती संजय जैस्वाल राष्ट्रवादीचे तालुकाकार्यअद्यक्ष सुनील पाखरे, एमआयएमचे तालुकापाद्यक्ष अजित जाधब या वजनदार राजकीय पुधऱ्यांचे लासूर स्टेशन हे गाव असूनही गावात आरोग्यसेवेचा बट्याबोळ झाल्याने हि राजकीय मंडळी आपले राजकीय वजन वापरून गोळ्या औषधी रुग्णांना उपलब्ध करून देतील का अशी रुग्णांत चर्चा आहे.

# मुलं चोरणारी महिला समजून तृतीयपंथीला भररस्त्यात मारहाण : पाच जणांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा:** जिल्ह्यातील जळगाव जामोद येथे तृतीयपंथीला मुलं चोरणारी महिला समजून काही नागरिकांनी जळगावच्या जुन्या बस स्टँडवर मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नागरिकांनी मारहाण करुन या तृतीयपंथीला पोलिसांना सुपूर्द केलं आहे. मात्र, पोलिसांच्या चौकशीत तृतीयपंथी मुलं चोरणारी नसल्याचे निष्पन्न झाल्याने जळगाव पोलिसांनी मारहाण करणाऱ्या पाच जणांवर भादंवीच्या ३२३, १४३, १४७, १४९ या कलमांद्वारे गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तवृत्त असे की, शहरातील नगरपरिषद उर्दू शाळा क्रमांक तीन समोर एका १२ वर्षीय मुलाने एका तृतीयपंथीला त्याला चॉकलेट देऊन हात पकडण्याची माहिती आपल्या कुटुंबांला दिली. यावरून कुटुंबीय संतप्त झाले. दरम्यान तृतीयपंथी एसटी बस स्टँड जवळ आला आणि शेगावला जाण्याकरता ऑटो रिक्षा केली. ऑटो रिक्षा हा जुन्या बस स्टैंडवर गेला असता तेथे ऑटो चालक काही वेळ थांबला असता. त्यावेळी १२ वर्षीय मुलाने त्याच तृतीयपंथीने आपल्याला चॉकलेट देऊन आपला हा धरला होता अशी माहिती नागरिकांना दिली. यावेळी काही नागरिकांनी कोणतीही शहनिशा न करता या तृतीयपंथीला मारहाण करण्यास सुरुवात केली आणि ऑटोमध्ये



बसवून तिला पोलीस स्टेशनमध्ये आणले. संबंधित तृतीयपंथी मुले चोरणाऱ्या टोळीपैकी एक असल्याची माहिती वाऱ्यासारखी संपूर्ण शहरात पसरली.तृतीयपंथीच्या तक्रारीनुसार प्राथमिक तपासणीत पोलिसांनी मारहाण करणाऱ्या पाच नागरिकांवर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक घोडेस्वार करीत आहे.



# सामाजिक बांधिलकी जपणारा वाढदिवस

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शेखर म्हस्के पाटील, म्हस्के पाटील पेट्रोलियम चे मालक एक युवा उद्योजक यांच्या वाढदिवसानिमित्त व्यंकटेश बालसदन भारतमाता नगर बीड बायपासच्या अनाथ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक रग थंडी आंगावर घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना फळे आणि गोड मिठाई नाश्टा, बीस्लरी पाणी बॉक्स देण्यात आला. या प्रसंगी गोकुळ शेट,बाजीराव हिवाळे पाटील, संतोषभाऊ हिवाळे पाटील, खैरे सर, शेअर भैय्या म्हस्के पाटील मित्रमंडळी आणि श्री व्यंकटेश बालसदनचे अधिक्षक देठे सर, देशमुख सर मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



# ‘वेदान्त’चा पहिल्यांदाच खुलासा

आधुनिक केसरी

‘वेदान्त-फॉक्सकॉन’ प्रकल्पासंदर्भात ‘वेदान्त’ समुहाने तळगावमध्ये १.५ लाख कोटी रुपयांचा सेमिकंडक्टर निर्मितीचा कारखाना उभारण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून दोन गोष्टींची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. तळेगावमध्ये हा प्रकल्प निश्चित करण्यापूर्वी अंतिम निर्णय घेण्याआधी केंद्र सरकारचा पाठिंबा आणि राज्य सरकारच्या मंत्रीमंडळाकडून संमती या दोन गोष्टींची मागणी ‘वेदान्त’कडून करण्यात आली होती. या दोन्ही मागण्यांचा उल्लेख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच ‘वेदान्त’चे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांना पाठवलेल्या पत्रात केला होता. मुख्यमंत्री शिंदेंनी पाठवलेल्या पत्रामध्ये, “तुमच्या दोन महत्त्वाच्या मागण्या केंद्र सरकाकडून पाठिंबा मिळवणे आणि मंत्रीमंडळाकडून मान्यता मिळवण्याच्या आहेत. या दोन्ही मागण्यांसंदर्भात राज्य सरकार काम करत असून अत्यंत वेगवान पद्धतीने निर्णय घेतले जात आहेत,” असं नमूद केलं होतं. हे पत्र शिंदे यांनी २६ जुलै रोजी पाठवलं होतं. ३० जून रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर महिन्याभराच्या आत शिंदेंनी केंद्र सरकाकडून पाठिंबा मिळवण्यासंदर्भात हलचाली सुरु असल्याची ग्वाही कंपनीच्या अध्यक्षांना दिली होती. शिंदे यांनी ‘वेदान्त’चे अध्यक्ष अग्रवाल यांच्याबरोबरच कंपनीचे अधिकारी, ‘फॉक्सकॉन’ आणि ‘अवॅनस्टॅरेट’ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यासाठी २९ जुलै रोजी दुपारी १२ वाजताचं आमंत्रण दिलं होतं. या पत्रामध्ये शिंदे यांनी आपल्याकडून पूर्ण सहकार्य केलं जाईल असं नमूद करण्यात आलं होतं. कंपनीला राज्याकडून उत्तम सवलती दिल्या जातील आणि यासंदर्भात मंत्रिमंडळाकडून मान्यता घेतली जाईल असंही आश्वासन देण्यात आलं होतं. एका वृत्तपत्राने महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना या पत्रानंतर नेमकं काय असं घडलं की प्रकल्प राज्याच्या बाहेर गेला याबद्दल विचारणा केली. “अग्रवाल यांचे ट्वीट पाहिल्यास त्यांनी पूर्वीच गुजरातमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला होता असं वाटतं आहे,” असं उत्तर सामंत यांनी दिलं आहे. सामंत यांनी अग्रवाल यांच्या गुरुवारच्या ट्वीटचा दाखला दिला आहे. ज्यात अग्रवाल यांनी या गुंतवणुकीसंदर्भात भाष्य करताना, “कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणूकीसाठी ‘वेदान्त-फॉक्सकॉन’कडून प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने वेगवगेळ्या जगांची पाहाणी सुरु होती. ही वैज्ञानिक आणि आर्थिक घटकांशी संबंधित कार्यपद्धती असून त्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लागतो. आम्ही ही प्रक्रिया दोन वर्षांपूर्वी सुरु केली होती. आमच्या कंपनी अंतर्गत तसेच इतर संस्थांच्या मदतीने केलेल्या पहाणीनंतर काही राज्यांची नावं पर्याय म्हणून निश्चित करण्यात आली. त्यामध्ये गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडूचा समावेस होता. आमचं उद्देश साध्य करण्यासाठी ही राज्यं योग्य असतील असा निष्कर्ष निघाला. मागील दोन वर्षांपासून आम्ही या राज्यांमधील सरकारांबरोबरच केंद्र सरकारच्या संपर्कात असून आम्हाला त्यांनी उत्तम पाठिंबा दिला आहे. काही महिन्यांपूर्वी आम्ही गुजरातचं नाव निश्चित केलं. त्यांनी आम्हाला अपेक्षित असणाऱ्या गोष्टी देऊ केल्याने ही निवड करण्यात आली,” असं म्हटलं होतं. १४ तारखेला ‘वेदान्त-फॉक्सकॉन’ कंपन्यांनी गुजरात सरकारसोबत हा प्रकल्प उभारण्यासंदर्भात सामंजस्य करार केला. हा करार झाल्यानंतर शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे, हा प्रकल्प महाराष्ट्राबाहेर जाण्यासाठी शिंदे सरकार जबाबदार असल्याचा आरोप शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीने केला आहे. २६ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांनी सामंजस्य करार करण्यासाठी अग्रवाल यांना पाठवलेल्या पत्रामध्ये, “या कार्यक्रमाला राज्यामधील निर्णय घेणारे राजकीय स्तरावरील सर्वात उच्च पदस्थ नेते उपस्थित असतील. आमच्या मते मंत्रिमंडळाकडून या प्रकल्पासाठी मान्यता मिळवण्याच्या दृष्टीने सामंजस्य करार होणे आवश्यक आहे. यामुळे मान्यता मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होईल. तसेच भारत सरकारने या प्रकल्पाला मान्यता देण्यासाठीही हा सामंजस्य करार फार महत्त्वाचा ठरेल,” असं म्हटलं होतं.

# 'राजपथ'ते 'कर्तव्य पथ'



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील ऐतिहासिक 'राजपथ' (किंग्सवे) चे नामकरण 'कर्तव्य पथ' असे केले. यासह, गुलामगिरीचे आणखी एक प्रतीक इतिहासाच्या कुंडात गेले. मोदींनी इंडिया गेटजवळ नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा 28 फूट उंच पुतळाही बसवला. येथे पूर्वी ब्रिटिश सम्राट जॉर्ज पंचम यांचा पुतळा होता. यासह, गुलामगिरीचे आणखी एक प्रतीक संपुष्टात आले.**

ब्रिटिश राजवटीत राजपथाचे नाव किंग्सवे होते आणि स्वातंत्र्यानंतर त्याचे नाव राजपथ असे ठेवण्यात आले. औपनिवेशिक राजवटीची शेवटची चिन्हे पुसून टाकण्यासाठी मोदींनी राजपथचे नाव बदलून कर्तव्य पथ केले. इंडिया गेटजवळ आयोजित इंद्रधनुष्य समारंभात मोदी म्हणाले, "गुलामीचे प्रतीक असलेला किंग्सवे, जो आजपासून इतिहासाचा विषय बनला आहे, तो कायमचा पुसला गेला आहे." आज कर्तव्यमार्गाच्या रूपाने नवा इतिहास रचला आहे.

इंडिया गेटवरील नेताजींच्या पुतळ्याचे अनावरण करताना मोदी म्हणाले, "आज आपले राष्ट्रीय वीर नेताजी सुभाषचंद्र बोस यांचाही मोठा पुतळा इंडिया गेटजवळ स्थापित करण्यात आला आहे. गुलामगिरीच्या वेळी ब्रिटीश राजवटीच्या प्रतिनिधीचा पुतळा होता. आज त्याच ठिकाणी नेताजींच्या पुतळ्याची स्थापना करून देशाने आधुनिक आणि सशक्त भारताचे जीवनही प्रस्थापित केले आहे. खरंच, ही संधी ऐतिहासिक आहे, ही संधी अभूतपूर्व आहे. आपण सर्व भाग्यवान आहोत की आज आपण या दिवसाचे साक्षीदार आहोत, त्याचे साक्षीदार आहोत.

नेताजींना 'महान व्यक्ती' असे वर्णन करताना मोदी म्हणाले, "सुभाषचंद्र बोस हे असे महान व्यक्ती होते जे पद आणि संसाधनांच्या आव्हानाच्या पलीकडे होते. त्यांचा स्वीकार असा होता की संपूर्ण जग त्यांना नेता मानत होते. त्याच्यात धैर्य आणि स्वाभिमान होता. त्याच्याकडे कल्पना होत्या, त्याला दृष्टी होती. त्यांच्याकडे नेतृत्व क्षमता होती, धोरणे होती. नेताजी सुभाष म्हणायचे – भारत हा आपला गौरवशाली इतिहास विसरणारा देश नाही. भारताचा गौरवशाली इतिहास प्रत्येक भारतीयाच्या रक्तात, त्याच्या परंपरांमध्ये आहे. नेताजी सुभाष यांना भारताच्या वारशाचा अभिमान होता आणि त्यांना शक्य तितक्या लवकर भारताचे आधुनिकीकरण करायचे होते. स्वातंत्र्यानंतर आपल्या भारताने सुभाषबाबूंचा मार्ग अवलंबला असता तर आज देश किती उंचीवर असता! पण दुर्दैवाने आपल्या या महान नायकाचा स्वातंत्र्यानंतर विस्मरण झाला. त्यांचे विचार, त्यांच्याशी निगडित प्रतीकांकडेही दुर्लक्ष झाले.

मोदी म्हणाले, 'नेताजींची ऊर्जा देशाला दिशा दाखवावी, असा आज देशाचा प्रयत्न आहे. कर्तव्यमार्गावरील नेताजींचा पुतळा हे त्याचे माध्यम बनेल. देशाच्या धोरणांवर आणि निर्णयांवर सुभाषबाबूंचा ठसा उमटू दे, त्यासाठी हा पुतळा प्रेरणादायी ठरेल. नेताजी सुभाष हे अखंड भारताचे पहिले प्रमुख होते ज्यांनी 1947 च्या आधी अंदमान मुक्त करून तिरंगा फडकवला होता. लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवायला काय मजा येईल याची कल्पना त्यांनी त्यावेळी केली होती. आझाद हिंद सरकारला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवण्याचे सौभाग्य मिळाले तेव्हा ही भावना मी स्वतः अनुभवली.

मोदी म्हणाले, 'म्हणून गुलामगिरीची मानसिकता सोडण्याचे हे पहिले उदाहरण नाही. ही सुरुवातही नाही आणि शेवटही नाही. मन आणि मानसाच्या स्वातंत्र्याचे ध्येय साध्य होईपर्यंत हा निश्चयाचा अखंड प्रवास आहे.



पंतप्रधान म्हणाले, 'हा बदल केवळ प्रतीकांपुरता मर्यादित नाही, हा बदल देशाच्या धोरणांचाही एक भाग बनला आहे. आज देशाने ब्रिटिश काळापासून चालत आलेले शेकडो कायदे बदलले आहेत. इतकी दशके ब्रिटीश संसदेच्या वेळा पाळणाऱ्या भारतीय अर्थसंकल्पाची वेळ आणि तारीखही बदलण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून आता देशातील तरुणांना परकीय भाषेच्या सक्तीतून मुक्त केले जात आहे. म्हणजेच आज देशाचा विचार आणि देशाचे आचरण दोन्ही गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होत आहेत. ही मुक्ती आपल्याला विकसित भारताच्या ध्येयापर्यंत घेऊन जाईल.

25 दिवसांपूर्वी स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून दिलेले वचन मोदींनी पूर्ण केले आहे. त्यांनी वसाहतवादाच्या शेवटच्या खुणा तर दूर केल्याच, पण देशातील जनतेला इंडिया गेटपासून बोट क्लबपर्यंत दोन्ही बाजूला कालवे आणि कारंजे असलेली हिरवीगार गॅलरी दिली.

477 कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेला हा पादचारी मार्ग 16.5 किमी लांबीचा आहे, मुख्य रस्ता ओलांडण्यासाठी 4 अंडरपास बांधण्यात आले आहेत, 74 जुने विद्युत खांब दुरुस्त करण्यात आले असून 900 नवीन खांब बसविण्यात आले आहेत. याशिवाय 400 हून अधिक नवीन बेंच, 150 हून अधिक डस्टबिन आणि 650 हून अधिक सूचना फलक लावण्यात आले आहेत. इंडिया गेट ते बोट क्लबपर्यंतच्या परिसरात विविध राज्यांतील खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याचे फवारे लावण्यात आले आहेत. हिरव्यागार हिरवळीच्या मधोमध लाल वाळूच्या दगडापासून बनवलेल्या बाकांची उभारणी करण्यात आली आहे.

नेताजींच्या या 28 फूट उंच पुतळ्याचे वजन 65 मेट्रिक टन आहे. हे 280 मेट्रिक टन काळ्या ग्रॅनाइटच्या एकाच खडकात कोरलेले आहे. नेताजींचा हा पुतळा बनवण्यासाठी जवळपास 26 हजार तास लागले. ही मूर्ती म्हैसूर येथील कारागीर अरुण योगीराज आणि त्यांच्या टीमने बनवली आहे. तेलंगणातील खम्मम येथून 100 फूट लांब आणि 140 चाकांच्या विशेष ट्रकमधून ही मूर्ती दिल्लीत आणण्यात आली. नवीन संसद भवन, केंद्रीय सचिवालय, उपराष्ट्रपती भवन आणि पंतप्रधानांचे निवासस्थान आता पुढच्या टप्प्यात तयार होणार आहे. मोदींनी लाल वाळूच्या दगडांच्या बाक, फूटपाथ आणि कालवे यांनी भरलेला हा विस्तीर्ण रस्ता बांधणाऱ्या कामगारांची भेट घेतली. पुढच्या वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या परेडला विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करेन, असे आश्वासन त्यांनी कामगारांना दिले.

राजपथाला कर्तव्यपथाचे नाव देणे आवश्यक होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारणे गरजेचे होते. गुलामगिरीच्या मानसिकतेची चिन्हे नष्ट करणे आवश्यक होते. हा देशाचा आत्मा आहे, हा आपल्या देशाचा अभिमान आहे. परंतु या संपूर्ण बांधकामाची एक व्यावहारिक बाजू देखील आहे. राजपथाच्या दोन्ही बाजूला ज्या सरकारी इमारती वर्षानुवर्षे सुरू होत्या त्या जुन्या झाल्या होत्या. सुरक्षा आणि वातानुकूलित ते पार्किंगपर्यंतच्या समस्या वाढत होत्या. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर या सरकारी इमारतींच्या कॉरिडॉरमध्ये जुन्या फायलींचा ढीग पडलेला आढळला. त्यांनी विविध मंत्रालयांच्या कार्यालयांची पुनर्रचना करण्यासाठी, त्यांना अधिक चपळ आणि कार्यक्षम बनवण्यासाठी आणि त्यांना नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी योजना तयार केली, जेणेकरून न्यू इंडियाला नवीन ओळख मिळू शकेल. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाचे काम जोरात सुरू असून ते आता अंतिम टप्प्यात आले आहे. जगाला लवकरच सशक्त भारताचे प्रतीक आणि गौरवशाली वारसा दिसेल.

# मराठवाडा मुक्तिलढ्यातील शंकरराव जडे यांचे योगदान

आधुनिक केसरी

**आर्यसमाजचे कार्य विशेष करून उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात अधिक आहे. या दोन जिल्ह्यांत अनेक वीर मराठवाडा मुक्तिसाठी लढले, शहीद झाले. पहिला हुतात्मा उमरगा तालुक्यातील गुजोटीचा वेदप्रकाश आहे. लातूर जिल्हा उस्मानाबाद जिल्ह्यात होता. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा क्रांतिकारकांचा बालेकिल्ला होता. येथे क्रांतिकारक काम करायचे व पांगरी, बार्शी मार्ग सोलापूर जिल्ह्यात पळून जायाचे. येथून बॉम्ब आणणे, शस्त्रे लपवून आणणे असे कार्यक्रम चालू होते. आर्यसमाज व सरदार वल्लभाई पटेल यांच्यामुळे निजामाच्या तावडीतून मराठवाडा मुक्त झाला. मराठवाड्याला स्वातंत्र्य हे अनेकांच्या हौतात्म्याने प्राप्त झाले आहे, हे कदापि विसरता येऊ शकत नाही. अशा ह्या मराठवाड्यातील असंख्य स्वातंत्र्य योद्ध्यांना मुक्तिदिनी विनम्र अभिवादन!**

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास हा रोमांचकारी इतिहास आहेच, त्यापेक्षा एकट्या मराठवाड्यातील नागरिकांनी एका अत्याचाराविरोधात लढा दिलेला आहे व एक इतिहास घडविला आहे, हे विशेष आहे. मराठवाडा मुक्तिलढा लढला गेला, तो यशस्वी झाला तो आर्यसमाजी लोकांमुळे. त्यांनी कशाचीही पर्वा न करता, प्राणांची बाजी लावून लढलेला हा लढा आहे. मराठवाड्यावर निजामाची सत्ता होती. मराठवाड्यातील जनतेवर रझाकार मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार करीत होते. त्यांचे राक्षसी किळसवाणे प्रकार चालूच होते. या जाचाला कंटाळून लोक आर्यसमाजच्या छत्रछायेखाली एकत्र आले. क्रांतीची ठिणगी पडली ती चिंचोली कॅम्पमधील तरुणांनी केलेल्या बॉम्बस्फोटामुळे! या चिंचोली कॅम्पचे प्रमुख होते स्वामी रामचंद्रजी मंत्री ऊर्फ स्वात्मानंदजी. त्या वेळची एक घटना अशी की, चिंचोली कॅम्पमधील काही तरुण स्टेट काँग्रेसच्या आदेशाची वाट पाहत होते. पण आदेश लवकर येत नव्हता. वरचेवर



स्व. शंकर माधव जडे



कै. पार्वतीबाई जडे

रझाकारांचे अत्याचार वाढत होते. कॅम्पमध्ये भरमार म्हणजे बंदुकांची गरज होती. ती कशाप्रकारे पूर्ण करावी याचा विचार चिंचोली
कॅम्पमधील तरुण करीत होते. त्यात लातूर-समाचारचे संस्थापक शंकरराव जडे, येडशी येथील काही तरुण, तसेच सध्या हयात असलेले जीवनधर शहरकर गुरुजी या सवारनी एक बेत रचला. येडशी-बार्शी रोडवर येडशीच्या जंगलात ढोकीचा करोडगिरी नाका होता. तेथे निजामी हत्यारी पोलिस होते, त्यांच्याजवळील हत्यारे पळविण्याचा बेत रचला. यासाठी नियोजन केले उरुसाचे! याच वेळी औरंगाबाद येथील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक विजयेंद्रजी काबरा आले होते. त्यांना ही योजना सांगितली. त्यांनी पीन बॉम्ब दिला. तो पीन बॉम्ब करोडगिरी ना3यावर टाकायचा व त्याच वेळी निजामाची शस्त्रे पळवायची. या कामगिरीवर असणारे शंकरराव जडे, येडशीचे तरुण, जीवनधर शहरकर आदींनी आदल्या दिवशी पाहणी केली. आखणी झाली. उरुसाचा दिवस ठरल्याने आदल्या रात्री पीन बॉम्ब टाकण्याचे निश्चित झाले. गर्द रात्रीच्या वेळी उरूस संपल्यावर पीन बॉम्ब टाकण्यात आला. त्या वेळी मोठा स्फोट झाला. हत्यारी पोलिस जागे झाले. लागलीच फायरिंग सुरू केली.

**दयानंद शंकर जडे**

हत्यारी पोलिस ठार झाले नाहीत याचे कारण म्हणजे ते आडवे झोपले होते, त्यामुळे इजा झाली नाही. त्यांनी बेछुट गोळीबार सुरू केला. सर्व तरुण स्वैरावैरा पळू लागले. अनेकांचे घुडगे फुटले, डो3याला मारला गेला. ज्या वेळी जडे व इतर तरुण खड्यात पडले, त्यावेळी डोक्यावरून सुं-सुं करीत गोळ्या जात होत्या. तरी जीव मुठीत धरून येडशी गाठली. दुसऱ्या दिवशी निजामी पोलिस व उस्मानाबादचा हैदरी येथे पोंहोचला. त्या वेळी एकाची चादर पडली होती, हे काम बदमाश काँग्रेसचे कार्यकत्याचे आहे, असे ओरडत शिव्या देऊ लागला. हा नाका तीन दिवस जळत होता. या स्फोटाचा परिणात एवढा झाला की, निजाम चिडला, अत्याचाराचे प्रमाण वाढले. कॅम्प सक्रिय झाला. आर्यसमाजचे कार्यकर्ते पेटून उठले. अशी अनेक कामे स्वातंत्र्य वीरांनी केली आहेत. हा एक प्रसंग आहे. असे कितीतरी प्रसंग अंगावर शहारे निर्माण करणारे आहेत. मात्र शस्त्रे पळविता आले नाहीत हे दुःख होते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शाश्वत विकासासाठी मूलभूत विज्ञान : आव्हाने आणि शक्यता



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**ब्रिटिश राजवटीत भारताने नामांकित शास्त्रज्ञांना जन्म दिला. रामानुजन, जगदीशचंद्र बोस, चंद्रशेखर व्यंकट रमन, मेघनाद साहा आणि सत्येंद्रनाथ बोस यांनी जगभरात भारताचे नाव उंचावले. मात्र, स्वातंत्र्यानंतर एकही आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरवला जाणारा शास्त्रज्ञ का निर्माण होऊ शकला नाही, याचा आपण कधी विचार केला आहे का? आपल्या देशातले प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ डॉ. सी. एन. आर. राव यांना अलीकडेच 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर करण्यात आला. या निमित्ताने आपल्या देशातली मूलभूत विज्ञानाच्या क्षेत्रातली स्थिती काय आहे याची चर्चा सुरू झाली आहे. या क्षेत्रातली आजची स्थिती जाणून घेण्याआधी थोडा इतिहास पाहू या.**

सुप्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक चंद्रशेखर वेंकटरमण यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी एक महत्त्वाचा शोध लावला. त्याला त्यांनी नाव दिले 'रमण परिणाम'. हा शोध इतका मोलाचा होता, की अवघ्या दोन वर्षांत म्हणजे १९३० मध्ये त्यांना भौतिकशास्त्रातल्या नोबेल पारितोषिकाचा सन्मान प्राप्त झाला. रमण यांच्या या प्रेरणादायी संशोधनाचे स्मरण करण्यासाठी १९८७ सालापासून २८ फेब्रुवारी हा दिवस भारतभर 'राष्ट्रीय विज्ञानदिन' म्हणून साजरा केला जातो. लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केला तर जगात भारत आज दुसऱ्या स्थानावर आहे. लवकरच तो चीनला मागे टाकून पहिल्या क्रमांकावर येणार आहे. जगातल्या प्रत्येक सहा माणसांपैकी एक भारतीय असतो. एवढी आपली लोकसंख्या अवाढव्य आहे. परंतु खेदाची गोष्ट अशी की, १९३० सालानंतर आजपावेतो अब्जावधी माणसे आपल्या देशात जन्माला आली, पण त्यांच्यापैकी एकही नागरिक या सर्वोच्च सन्मानापर्यंत पोहोचू शकला नाही. ही परिस्थिती अतिशय बोलकी आहे. वैज्ञानिक क्षेत्राकडे झालेल्या भारताच्या दुर्लक्षावर विदारक प्रकाश टाकणारी आहे. मूलभूत विज्ञानाबाबत आपला समाज जी आत्यंतिक अनास्था दाखवत आहे ती ठळकपणे अधोरेखित करणारी आहे. विज्ञानाच्या एकमेव नोबेल अ‍ॅवॉर्डला आपण अजून किती वर्षे मिरविणार आहोत आणि स्वतःचीच पाठ थोपटून घेणार आहोत हा प्रश्न आज उपस्थित होणे गरजेचे आहे, तरच आपण विज्ञानाच्या नवीन नोबेल पारितोषिक मिळविण्याच्या ध्येयाकडे प्रवास सुरू करू शकू.

शाळेत/महाविद्यालयात शिकणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यांला 'तुला मोठेपणी कोण व्हावंसं वाटतं' असा प्रश्न विचारला तर हमखास मिळणारे उत्तर म्हणजे डॉक्टर किंवा इंजिनिअर किंवा यांसारख काही. याव्यवसायांपलीकडे काही करीअर असू शकते असे विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांनाही अजिबात वाटत नाही. हे करीअर निवडण्यामागे असणारे कारण अगदी स्पष्ट आहे. हे व्यवसाय भरपूर पैसा देतात. पण ही गोष्ट उघडपणे मान्य न करता 'या व्यवसायाला खूप वाव आहे' असे सांगितले जाते. अशा रीतीने हुशार विद्यार्थी या व्यवसायाकडे वळतात.

१९८२च्या सुमारास आपल्या महाराष्ट्रात 'विनाअनुदान संस्कृती' सुरू झाली आणि महाराष्ट्रात विनाअनुदान तत्त्वावर चालणाऱ्या इंजिनिअरिंग महाविद्यालयांचे पेवच फुटले. लठ्ठ देणग्या देऊन मठ्ठ विद्यार्थ्यांनाही तेथे प्रवेश मिळू लागला. मग हुशार विद्यार्थ्यांचा तर प्रश्नच नाही. पूर्वी इंजिनिअरिंगला प्रवेश मिळणे अवघड होते. आता प्रवेश न मिळणे अवघड झाले आहे. या महाविद्यालयांच्या अनैसर्गिक वाढीमुळे जागा जास्त आणि प्रवेश घेणाऱ्या इच्छुकांची संख्या कमी अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. सरकारच्या या 'विनाअनुदान' धोरणाचा जबरदस्त फटका १९८२ सालापासून जवळपास सर्वच विज्ञान महाविद्यालयांना बसला, कारण त्यांची विद्यार्थिसंख्या झपाट्याने कमी झाली. दुसरा फटका गुणवत्तेच्या संदर्भात बसला. अगदी सामान्य बुद्धीमत्तेच्या विद्यार्थ्यांलाही इंजिनिअरिंगला प्रवेश मिळू लागला. त्यामुळे त्याच्यापेक्षाही सुमार विद्यार्थी विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेऊ लागले. अशा विद्यार्थ्यांमधून चांगले वैज्ञानिक, चांगले शिक्षक/ प्राध्यापक निर्माण होण्याची अपेक्षा करणेच चूकच. आमच्या मुलाने आय.टी. क्षेत्रात जाऊन खोऱ्याने पैसा ओढावा, पण दुसऱ्याच्या मुलाने तुलनेने कमी पगाराच्या वैज्ञानिक/ शिक्षक या नोकऱ्या पूर्ण समर्पणवृत्तीने कराव्यात अशी आपल्या समाजाची दुटप्पी वृत्ती बनली आहे. वराबद्दलच्या अपेक्षा लिहिताना कोणतीही मुलगी वैज्ञानिक/ शिक्षक/ प्राध्यापक नवरा हवा असे लिहित नाही. ही घटना फार बोलकी आहे, कारण या व्यवसायाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन त्यातून लख्खपणे स्पष्ट होतो. या सगळ्या परिस्थितीमुळे आपल्या देशात मूलभूत विज्ञानाची फार मोठी परवड चालू आहे. देशातल्या अनेक प्रयोगशाळांना चांगले वैज्ञानिक उपलब्ध होत नाहीत. सामान्य शाळा/ महाविद्यालयांना चांगले अध्यापक मिळत नाहीतच, पण आयआयटीसारख्या नामवंत शिक्षण संस्थांतही चांगल्या प्राध्यापकांचा विलक्षण तुटवडा जाणवतो आहे.

याचा गंभीर परिणाम अर्थातच त्या संस्थांच्या दर्जावर होणार आहे. त्यामुळे जीवाचा आटापिटा करून आपल्या देशातले अतिशय बुद्धिमान विद्यार्थी प्रवेश मिळवतील खरे, पण त्यांना कदाचित तेवढे बुद्धिमान प्राध्यापक तेथे मिळणार नाहीत अशी परिस्थिती भविष्यकाळात उद्भवण्याची मोठी शक्यता आहे.

वस्तुतः मूलभूत विज्ञानाचे क्षेत्र अतिशय आव्हानात्मक आहे. विलक्षण बौद्धिक आनंद देणारे आहे. खासगी क्षेत्रात असलेली नोकरीची अनिश्चितता, कामाचे अनिश्चित तास यापासून मूलभूत विज्ञानाचे क्षेत्र मुक्त आहे. आपल्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी येथे फार मोठा वाव आहे. त्यासाठी सरकारने कोट्यावधी रुपयांची तरतूद केलेली आहे, अनेक नवीन संस्था/ योजना गेल्या काही वर्षांत सुरू केलेल्या आहेत. मूलभूत विज्ञानात पीएच.डी. करण्यासाठी सरकार शिष्यवृत्ती देते. पण हेच विद्यार्थी आपली पीएचडी पुर्ण झाल्यानंतर संशोधन पुढे चालू न ठेवता नौकरीचा मार्ग स्विकारतात. हुशार विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच हेरून त्यांच्यात संशोधनाची आवड निर्माण व्हावी (कॅच देम यंग!) यासाठी केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातर्फे इन्स्पायर नावाची योजना सुरू करण्यात आली आहे. या शब्दाचे पूर्णरूप असे आहे- इनोव्हेशन इन सायन्स परस्युट फॉर इन्स्पायर्ड रीसर्च. इयत्ता सहावी ते दहावीचे विद्यार्थी या योजनेसाठी निवडले जातात. त्यांच्यासाठी खास शिबिराचे आयोजन केले जाते. त्यांचा सर्व खर्च सरकार करते. याशिवाय शालेय/ कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना, नॅशनल टॅलेन्ट सर्च, सायन्स ऑलिम्पियाड अशा अनेक स्पर्धात्मक परीक्षा होतात. त्यात यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक संस्थांमध्ये थेट प्रवेश मिळतो. वैज्ञानिक संशोधनाकडे हुशार विद्यार्थी आकर्षित व्हावेत यासाठी केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने काही वर्षांपूर्वी ५ केंद्रांची स्थापना केली आहे.

देशात दोनशेहून अधिक राष्ट्रीय प्रयोगशाळा, डझनभर संस्थांआणि शेकडो विद्यापीठे आहेत. भारताने अंतराळ, आण्विक क्षेपणास्त्र क्षेत्रात काही प्रमाणात यश मिळवले आहे. याशिवाय मूलभूत विज्ञानात संशोधन करण्यासाठी वाव देणाऱ्या अनेक संस्था आपल्या देशात पूर्वीपासून आहेतच. आपल्याकडे बंगलोर येथील 'इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन' (इस्त्रो) ही संस्था प्रसिद्ध आहे, जी एकावेळी १०४ उपग्रह अवकाशात सोडू शकते; पण तंत्रज्ञानाच्या या कार्यासाठी नोबेल अवॉर्ड मिळू शकत नाही. आपल्याकडे अनेक 'री-सर्च' करणाऱ्या संशोधन संस्था आहेत, ज्या विविध विषयांवर शोधनिबंध प्रकाशित करतात मात्र त्यात अभावानेच नावीन्य आढळते. नावीन्य आढळले तरी मानवी जीवनावर दूरगामी परिणाम घडेल असे शोध भारतात किती लागतात या प्रश्नातच आपल्याला नोबेल का मिळत नाही याचे उत्तर दडलेले आहे. 'आयसर' म्हणजे इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ सायन्स एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च अशा शिक्षण आणि संशोधनाला वाहिलेल्या संस्था नव्याने उदयास आल्या मात्र त्यांचे चित्रदेखील फारसे आशादायी नाही. हवामान संशोधन केंद्र - दिल्ली आणि पुणे येथे हवामान संशोधन केंद्र म्हणजे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरिओलॉजी' ही संस्था आहे. देशातील शेतकऱ्यांना आणि भारतीय हवामान संस्था अचूक हवामान अंदाज मिळावे यासाठी ही संस्था कार्यरत असणे अपेक्षित आहे, मात्र तसे घडत नाही. देशातील शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांची संख्या पाहता जगातील भारताचे स्थान तिसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र, सर्व वैज्ञानिक संशोधन हे परदेशी शास्त्रज्ञांच्या नावावर जमा आहे. त्यात एकाही भारतीयाचे नाव दिसून येत नाही. अशी स्थिती पाहून आपल्या देशात संशोधन सुरू आहे की नाही, यावरच प्रश्नचिन्ह उभा राहते. भारतीय प्राथमिक शिक्षणापासून ते आयआयटी वगैरे शैक्षणिक संस्थातून जोपर्यंत आपण आपली मानसिकता बदलत नाही तोपर्यंत नोबेल अवॉर्डचे स्वप्न पाहणेदेखील दिवास्वप्न पाहण्यासारखे आहे. मात्र हे चित्र बदलणे शक्य आहे. गरज आहे ती मानसिकता बदलण्यासाठी आपली विचार पद्धती आणि आचरण बदलण्याची. मग एकापेक्षा जास्त नोबेल अवॉर्ड भारताला सहज शक्य होईल. या आणि इतरही क्षेत्रात बुद्धिमान विद्यार्थ्यांची फार आवश्यकता आहे. अनेक मोठमोठया संधी, सन्मान, पुरस्कार अशा विद्यार्थ्यांची वाट पाहात आहेत.

तांत्रिक तयारी आणि प्रतिस्पर्धात्मक क्षमतेसाठी आपल्याला आव्हानांचे आणि संधीचे प्रामाणिकपणे आकलन करावे लागणार आहे. देशासमोर स्वच्छ पाणी, आहार, पर्यावरण, हवामानबदल, संरक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मोठी आव्हाने आहेत. त्याचबरोबर तंत्रज्ञानाचा विकासासाठी लाभ कसा घेता येईल, हेही पहावे लागणार आहे. यासाठी देशातील प्रमुख संस्थांना सर्व क्षेत्रांशी जोडण्यासाठी विज्ञानपूरक सामाजिक जबाबदारीच्या कल्पनेचा विकास करावा लागणार आहे. सरकार मूलभूत विज्ञानापासून ते विविध क्षेत्रातील नवनवीन संशोधन करण्यासाठी, मदत करण्यासाठी तयार आहे. २०३० पर्यंत भारत जगातील आघाडीच्या तीन देशांच्या पंक्तीत जाऊन बसेल, अशी आशा आहे. परंतु, या क्षेत्रात नवीन शोध आणि नवीन तंत्रज्ञानाचा विकास होत नाही, तोपर्यंत देशाला झेप घेता येईल, असे वाटत नाही. कारण नवसंशोधनाच्या यादीत भारताचा समावेश जगातील सर्वात मागास देशात होतो. याचा अर्थ संशोधन क्षेत्रात आपणच मागासलेले आहोत, असे काही नाही. आपल्याकडे नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिजसंपदा विपुल आहे. त्यासाठी 'स्टार्टअप इंडिया' कार्यक्रम योग्य प्रकारे राबवला गेला, तर त्यातून युवाशक्तीच्या प्रतिभेला नवे बळ मिळेल. नवी पिढी विज्ञानाच्या मूलभूत क्षेत्रामध्ये संशोधन करत नाही, तोपर्यंत आपण जागतिक पातळीवर विज्ञानाच्या स्पर्धेत यशस्वी होऊ शकत नाही.

# गंगेत भोपळा बुडवला



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

आधुनिक केसरी

**माझ्या गावाच्या जवळ मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व खान्देशच्या सीमेवर सातमाळा अजिंठा डोंगररांगेत नाशिक जिल्ह्यातील जातेगाव येथे महादेवाचे पिनाकेश्वर मंदिर असून मी बालपणी बालमित्रांसोबत श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी महादेवाच्या दर्शनाला पायी पायी दहा-बारा किलोमीटर अंतर तुडवीत जात असे. त्यावेळी डोंगरावर हिरवाईने नटलेले झाडे-झुडपे,वृक्षवेली पाहून धरतीवरील स्वर्गात आल्याचा भास होत असे.**

खडकातून वाहणारे नितळ पाणी पिऊन व सागाच्या पानाची टोपी डोक्यावर घालून आम्ही मंदिरात दर्शनासाठी जायचो तिथं पोट भरेपर्यंत नारळाचा प्रसाद खाल्ल्यानंतर आईने फडक्यात बांधून दिलेल्या भाकरी तिथंच एखादया मोठ्या खडकावर बसून खाता खाता उत्तरेकडील धुक्यात हरवलेल्या खान्देश भूमीकडे कुतूहलाने पहायचो की इतक्या खोल गड्ड्यात हे लोकं कसे राहत असतील?

डोंगरावर बरेच गंगेचे पाण्यावाले लोकं हातात वेळूची मोठी काठी व भोपळा घेऊन मंदिरात प्रवेश करायचे व हर हर महादेवच्या गर्जनेने संपूर्ण परिसर दणाणून जायचा व ते भक्त सत्तर किलोमीटर अंतरावर असलेल्या वैजापूर व श्रीरामपूर तालुक्याच्या सीमेवरील सरला बेट..वांजरगावं येथून पवित्र गोदावरी नदीचे पाणी आदल्या दिवशी भोपळयात भरून रात्रभर अनवाणी पायाने चालून डोंगरावर थकून भागून आलेले असल्याचे मला त्यांचे अप्रूप वाटायचे.

भोळ्या महादेव बाबाचे भक्तगण भोपळ्यात भरून आणलेले गंगेचे पवित्र जल महादेवाच्या पिंडीला अर्पण करीत असे त्यावेळी मला ही वाटायचे की आपण मोठे झालो की गंगेचे पाणी आणून देवाच्या पिंडीवर टाकू.

ते कॉलेजचे वय होते पण रोज कॉलेज मध्ये जाण्याची परिस्थिती नसल्याने मी आठवड्यात एकदा कॉलेजच्या लायब्ररीत जाऊन पुस्तकं आणून रात्री उशिरापर्यंत अभ्यास करत असे कारण दिवसभर ट्रॅक्टरवर वाळू मुरूम भरणे,उन्हाळ्यात वावरात उन्हाळ खर्डा देणे,पालकाटे तोडणे व इतर मेहनतीचे काम करणे यातच दिवस जात होते.

श्रावण महिन्यात गावातील तरुण भक्त मंडळी गंगेचे पाणी आणण्यासाठी जात होते म्हणून मी ही पाणी आणण्यासाठी एक काठी व भोपळा शोधून तयार झालो अन गावातील मित्रांसोबत श्रावणात तिसऱ्या रविवारी सकाळी घराच्या बाहेर पडलो गावातील सर्व मंदिरात दर्शन घेऊन आम्ही पाण्यावाले भाडयाच्या जीपने वैजापूर मार्गे सरला भेटावर हजर झालो. पाऊस कमी झाल्याने नदीला कमी पाणी होते.सरला बेटावर गंगागिरी महाराजांची समाधीचे दर्शन घेतले.तिथं आमच्या सारख्या हजारो भक्तांसाठी दानशूर व्यक्तीने फराळासाठी केळीची व्यवस्था केली होती. त्याचा लाभ घेऊन व सोबतीला असलेली शिदोरी खाऊन आम्ही भोपळे भरून घेतले व गणपती बाप्पाची आरती घेऊन गोदावरी नदीचे दर्शन घेतले व अनवाणी पायाने संध्याकाळी चार वाजता निघालो.

वांजरगाव पार केल्याबरोबर पहिल्या पडीतात बाभळीच्या काट्याच्या फांदीने स्वागत केले अन अलगद पाय रक्तबंबाळ होऊन काट्याची कळ मेंदूपर्यंत गेली पण आता ठरलं की काही झालं तरी माघार नाही.भोलेबाबाच्या पिंडीला गंगाजल अर्पण करायचे म्हणजे करायचे. अन एका हातात काठी व कमरेला भोपळा बांधून हर हर महादेवच्या गर्जनेने डोंगराच्या दिशेने प्रवास सुरू झाला.मस्की, सटाणा,तिडी-वाडी मार्गे जातांना रस्त्यात तीडी येथे मोठ्या बंधूचे साडूभाऊच्या घरी आम्ही सर्वांनी चहा घेतला व सूर्य मावळेपर्यंत सवंदगावला पोहचलो तिथं पावसाला सुरुवात झाली अन भर पावसात बोरसरपर्यंत आल्यानंतर एका मंदिरात तासभर आडोश्याला थांबलो तितक्या वेळात काही सिगारेट पिणाऱ्यांनी रस्त्यावरील किराणा दुकान गाठून सिगारेट पिणे सुरू केले. तासभरात पाऊस कमी होऊन आम्ही शिवूरच्या दिशेने निघालो रात्री दहा वाजेच्या सुमारास शिवूरला पोहोचेपर्यंत पाय दगडाच्या बारीक खड्यामुळे जेरीस आले होते. आम्ही आता एका हॉटेलमध्ये थांबलो कारण खूप भूक लागली होती पण बाकडयावर बसताना पाय खाली लोंबते ठेवता येत नव्हते कारण पाय आखडल्या नंतर ते पुन्हा सरळ करून पुढला प्रवास शक्य नव्हता.

आम्ही शिवूरवरून आता बोलठानच्या दिशेने निघालो.खूप थकवा जाणवत होता.रस्त्याने मामाचे गाव जिरी लागले पण थांबलो नाही कारण आता थांबला तो संपला हे निश्चित ठरलेले होते .रात्री एक वाजेपर्यंत बोलठानमध्ये भोलेबाबाचे दानशूर भक्त केळी वाटत होते तिथं उभ्या उभ्या केळी खाऊन पुढच्या प्रवासाला निघालो तोपर्यंत रात्रीचे दोन वाजून गेले होते. पुढे सात आठ किलोमीटर अंतर जवळ केले व डोंगराच्या पायथ्याशी पोहचलो.वरती मंदिराच्या कळसावर भव्यदिव्य लायटिंग दिसत होती.आम्ही शिवसोंडीच्या मार्गाने पहाटे मंदिरात प्रवेश केला व भोपळ्यातील पवित्र पाणी पिंडीला अर्पण करून गाभाऱ्याच्या बाहेर पडलो.आता बरोबरचे गावातील साथीदारांनी डोंगर उतरणे सुरू केले पण माझ्या सोबत माझा चुलत भाऊ की जो खूप थकलेला होता म्हणून आम्ही मंदिराच्या परिसरात खाली थोडी मोकळी जागा पाहून झोपलो की तिथे आमच्या सारखे बरेच जण आराम करीत होते.कुठं डोळा लागला न लागला तर दोघे जण आमच्या जवळ आले व कुठले काय अशी विचारपूस करू लागले तेव्हा त्यांना सांगितले की भाऊ झोपू दया आम्हाला आता अन तुम्ही ही थोडा आराम करा अन मी झोपी गेलो.

आता सकाळ झाली .सूर्याचे सोनेरी किरणे हिरव्यागार गवतावर पसरली अन मला जाग आली अन पाहतो तर माझी काठी जी झोपतांना जवळ होती ती जवळपास कुठं ही नव्हती अन माझ्या लक्षात आले की पहाटे आपली विचारपूस करणाऱ्यानी काठी चोरली आहे कारण काही पाण्यावाले काठी फक्त डोंगर उतरण्यासाठी लागते मग फुकट बोजा आधी कशाला सांभाळायचा.वेळेवर पाहू.. असे वेळेवर पाहणारे भामटे ही देवाचे भक्त असू शकतात याचे वाईट वाटले अन हळू हळू एका काठीच्या आधाराने आम्ही दोघे भाऊ..डोंगर उतरून मुख्य रस्त्यावर आलो.. अन भाडोत्री जीप पकडून गावाचा रस्ता धरला.

# संस्कृतीतील बदल

आधुनिक केसरी


जमाना बदल गया, जमाने के साथ चलो" ही अशी वाक्य नेहमी ऐकिवात येतात. कुठल्या बाबतीत नेमके बदलून पुढे जायचे ? हेच आकलन होत नाही. परिवर्तनशीलता हा समाजाचा ढाचा आहे. समाजात घातक-विघातक गोष्टी घडत असतील, तर नक्कीच त्या आग्रहपूर्वक टाळून पुढे जावे. पण काही वेळा जुन्या चालीरीती, परंपरा, रूढी आणि नवीनीकरण यांचा उत्तम समन्वय साधण्याचा प्रयत्न व्हावा. तो सर्वांसाठीच हितकर ठरतो.

नुकताच गणेशोत्सव पार पडला आहे आणि यंदाचा तर उत्साह, जल्लोष आणि धुमधडाक्यात साजरा झाला. प्रत्येकाने आपली हौस-मौज पुरवली. तब्बल दोन वर्षांची उणीव भरून काढली. मागील 25-30 वर्षांचा काळ आणि सध्याचा काळ , यात खूप तफावत दिसून येतो. गणेशोत्सव हा जगभरात प्रसिद्ध आहे. जागतिक स्तरावर आहे, परदेशस्थ भारतीय ही तेवढ्याच उत्साहात साजरा करतात, हे जरी खरे असले तरी, सोशल मीडिया च्या माध्यमातून ही खूप प्रसिद्धी मिळाली, हेही खरेच आहे. गणपती अनेकांना काम मिळवून देतो, प्रत्येक जण त्याच्या कार्यात गुंतलेला असतो.



सुनिता रोझेकर
मो.नं. 9876467925

काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात, त्या म्हणजे, भक्तीभाव, शास्त्र-शुद्धता, नियम-निष्ठा, पारंपरिकता, शुचिर्भूतपणा, या गोष्टी कालबाह्य झालेल्या दिसून येतात. सध्या दिखाऊपणा, चढाओढ, अतिशयोक्ती, ऐश्वर्य प्रदर्शन, एक अवडंबर माजलेले दिसते. पूर्वी जुनीजाणती मंडळी धाक-धपडशा दाखवयाची. पूजन, अर्चन, शोषडशोपचार, दुर्वा अर्चन, होमहवन, अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन याला खूप महत्त्व असायचे.. आता या गोष्टी कालबाह्य झाल्या, कारण कुटुंब विभक्त झाली. आता साज-शृंगार, कपडे-लत्ते, झगमगाट, सजावटी, फटाके, ढोल-ताशे त्यातही चढाओढ, हेच अवडंबर माजलेले दिसते, पुढील पिढीला आपण सण - उत्सव का व कसे साजरे करावेत, त्यामागील कारण, घडलेल्या गोष्टी, जोडलेल्या कथा, या सांगायला मागील तिसरी पिढी उरली नाही. पण पुढील पिढीला संस्कृती चे महत्त्व पटवून सांगणे अत्यंत आवश्यक आहे. पण हल्ली सवडी शास्त्र काढले जाते. देश परत्वे, काल परत्वे, स्थान परत्वे, वय परत्वे बदल करावेत, पण संस्कृती चा मूळ गाभा सोडू नये, मूठमाती देऊ नये.. नाही तर कालांतराने परदेशस्थ मंडळींना आपल्याला समजवायची वेळ येईल. जून्या - नव्याचा सुरेल समन्वय साधावा.




# आता मुलांचे शिक्षण झाले अगदी सोप्पे

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीमध्ये खऱ्या अर्थाने बरेच सण खूप चांगले आहेत. यापैकी चांगला आणि मनाला भावणारा सण म्हणजे नागपंचमी. आज आपण नागपंचमीच्या सणाबद्दल थोडसं अवलोकना करणार आहोत. खरंतर हा सण खूप स्तुत्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारा आहे. या सणांमध्ये कुठलाही विपर्यास नाही. अंधश्रद्धा नाही. केवळ आणि केवळ निसर्ग रक्षणाच्या संदर्भात रूढ झालेला, तयार केलेला, अंमलात आणलेला सण म्हणून आपण नागपंचमीकडे पाहू.**

पाचवी ते बारावीच्या मुलांना खूशखबर आहे त्यांना आता इंग्रजी, गणित आणि विज्ञान हे विषय आता खूप सोप्पे होणार कारण पुण्याच्या एका कंपनीने पाचवी ते बारावीच्या मुलांसाठी एक सोप्पे शैक्षणिक ॲप बनविले आहे जे मुलांची अभ्यासाची भीती काढून टाकणार आहे या ॲपचे नाव आहे सहज शिक्षा ॲप, मराठी, सेमी आणि इंग्रजी या माध्यमांतील मुलांना या ॲपचा खूप फायदा होणार आहे, या ॲपचे खूपसारे वैशीष्ठे आहेत ज्यामुळे मुलांचा अभ्यास सोप्पा होणार आहे, प्रत्येक चाप्टरवर प्रश्न, अनेक सराव प्रश्नपत्रिका, दर आठवड्याला टेस्ट, कधी अभ्यास करावा याचे बंधन नाही, प्रत्येक विषयाचे एक्सपर्ट कायम तुमच्या सोबत, पाचवी ते बारावी कोणत्याही वर्षासाठी वार्षिक फिस अवघे 3500 रुपये, जे अतिशय गरीब विद्यार्थिही भरू शकतो, ॲप कितीही वेळ वापरू शकतो, एक प्रश्न कितीही वेळा पाहू शकतो, दर महिन्याला पालकांसोबत चर्चा, प्रोग्रेसबद्दल शंकेचे समाधान, प्रत्येक विद्यार्थ्यांचा विक पोर्शन काढून त्याची वेगळी तयारी करून घेतली जाते, सर्व विषयांचे तज्ञ शिक्षक मार्गदर्शन करित आहेत, प्रत्येक चाप्टरचे ओडियो-विडीओ मुळे विषय पटकन डोक्यात बसतो, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्लास ऑनलाइन नसल्याने मुलांना त्यांच्या वेळेनुसार आहि कितीही वेळा परत-परत बघता येते त्यामुळे डोक्यात सहज बसते व अभ्यासाची भीती नाहीशी होते, मुलांनी दिवसभरात जेवढ वेळ मोबाइलवर गेम खेळण्यासाठी किंवा टाइमपास म्हनून वेळ घालवतात त्याच्यापेक्षा अर्धा वेळ जरी या ॲपमधून अभ्यास केला तरी सर्व पोर्शं कव्हर होईल आणि बाहेर ट्युशन लावायची गरज नाही, ते पैसेही वाचतील.

सहज शिक्षण लर्नींग ॲप खूप जास्त महाग ठेवून कमी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यापेक्षा अगदी कमी किंमत ठेवून जास्तीतजास्त विध्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे व अगदी गरीब विद्यार्थ्याला परवडेल अशी किंमत ठरवून सहज शिक्षा लर्निंग ॲपनी विद्यार्थ्यांसाठी खूप मोठी पर्वणीच उपलब्ध करून दिली आहे, कोट्टा व पुण्यातील उच्च शिक्षित प्राध्यापक वृंद यांनी अगदी सोप्या भाषेत हा अभ्यासक्रम तयार केला आहे जो विद्यार्थ्यांना खूप पसंद पडत आहे व ग्रामिण भागातूनही विद्यार्थ्यांचा खूप चांगला प्रतिसाद सहज शिक्षण लर्नींग ॲपला मिळत आहे. **सहज शिक्षा :** आता मुलांच्या अभ्यासाची काळजीच करू नका ॲप द्वारे सहज अभ्यास करायची सवय मुलांना लावा.

हजारो मुलांनी व पालकांनी ह्या ॲपचा लाभ घेतला आहे, फ्री डेमो ॲपसाठी 8605703233, 7038028404 या नंबरवर संपर्क साधू शकता.

# खान्देशच्या साहित्य वाटचालीत चेतश्री प्रकाशनाचा हात, वा. रा. सोनारांनी दिली अनेकांच्या लेखन धडपडीला साथ !

बालकवी जन्मशताब्दी निमित्ताने आमच्या गावात १९९० साली राज्यस्तरीय साहित्यिक कार्यक्रम झाला होता. त्या निमित्ताने तात्या आमच्या गावी आले होते. पद्मश्री ना. धो. महानोर, पुरुषोत्तम पाटील, तत्कालीन विधानसभाध्याक्ष अरुणभाई गुजराथी यांना एकत्र पाहणं, त्यांना ऐकणं, त्यांच्या सोबत फिरणं आणि त्यांच्याशी संवाद साधणं हा माझ्यासाठी आनंदयोग होता. अमृतयोग होता. या क्षणानेच माझ्यात शब्दांचं बीजारोपण झालं. मला शब्दस्वप्न दाखविलं. माझ्यातला साहित्यिक कार्यकर्ता जागा झाला. आणि, सन्मित्र, साहित्यातील माझे गुरु डॉ. संजीवकुमार सोनवणेंसोबत मी साहित्याची वाट चालू लागलो. बालकवी स्मारकासाठी प्रयत्न करु लागलो. या वाटेवर अनेक थांबे आलेत. जे कधी नाऊमेद करणारे होते. तर, कधी यशाची झालर लावणारे होते. त्यावाटेवर भेटलेले वारातात्या म्हणजे एक ज्ञानपोयीच वाटले. ज्यांनी माझी ज्ञानाची तृष्णा तर भागविली, सोबत शब्दांची शिदोरी देत त्यांनी माझा पुढील प्रवास सुकर केला. या तिघांनी आम्हाला पाठीशी उभं राहण्याचं आश्वासन दिलं होतं. ते त्यांनी अखंड जपलं.

साहित्य कला मंचतर्फे बालकवी पुरस्कार विजय चोरमारे यांना द्यायचा होता. त्यासाठी ना. धो. महानोर, पुरुषोत्तम पाटील आणि वारातात्यांना निमंत्रित केले होते. ज्यांच्या माध्यमातून या तिघांना बोलावले होते, त्यांनी मानधन द्यावं लागेल असं सांगितलं होतं. ठरल्यावेळी हे तिघं महानुभाव स्वतःच्या गाड्यांनी आले. धरणगावच्या कुमार चित्रमंदिरात देखणा पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. तिघांनी आमच्या प्रयत्नांचं, नवोपक्रमांचं भरभरुन कौतुक केलं. वं. दे लोहार आबा यांच्याकडे घरगुती भोजनाचा कार्यक्रम ठेवला होता. तो आटोपून तिघं जायला निघाले. त्यांना मानधन म्हणून, प्रत्येकी ५००/-रु.ची पाकिटं तयार केली होती. ती मी तात्यांकडे दिली. तेव्हा तिघांनी चमकून विचारले. "अरे हे काय.?" मी म्हटलं मानधनाचं पाकिट आहे. ते म्हणाले "चौधरी, तुमची संस्था श्रीमंत दिसते. अरे साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी, काय, काय दिव्य करवं लागतं, ते आम्ही जाणतो." असं म्हणत वारातात्यांनी तिघांची पाकिटं परत देत, माझ्या हातात कोंबली. पाठीवर हात ठेवला."खूप छान काम करत आहात. ते असंच पूढे चालू ठेवा. आम्ही सोबत आहोतच. वाटेल तेव्हा हक्काने आवाज द्या !" असं म्हणत तिघं गाड्यांमध्ये बसले. आणि, हसत बोलत निघून गेले. वागणं, बोलणं, साहित्यात लिहणं याचा समन्वय आम्ही, याची देही, याची डोळा अनुभवला. बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले.! हे सुवचन यांच्याकडे पाहून स्मरते. आपोआप श्रध्देने माथा झुकतो. पुढे अनेक वर्षे ही मंडळी पाठिशी उभी राहिली. ते आमच्याशी बोलतात, चर्चा करतात, हीच आमची श्रीमंती होती. आहे.

महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात दोन साहित्यप्रभू तात्या म्हणून ओळखले जायचे. एक पुण्यभूमी नाशिकचे तात्यासाहेब वि. वा. शिरवाडकर आणि दुसरे खानदेशच्या पंढरीतले तात्यासाहेब वा. रा. सोनार. मी भाग्यवान आहे, की या दोन्ही तात्यासाहेबांच्या घरी जावून मी त्यांच्या सानिध्यात माझ्या जीवनाचे काही क्षण सोनेरी करु शकलो. त्यांच्या संपर्कात येणं, त्यांच्याशी संवाद साधणं, त्यांनी पाठीवर हात ठेवून आशीर्वाद देणं. म्हणजे, साहित्य वाटेवर चालणाऱ्या वारकऱ्यासाठी जीवन कृतकृत्य करणारे क्षण. वारातात्यांचं पू. सानेगुरुजींवर विशेष प्रेम. ते जगण्यात आनंद शोधायचे. आनंदावर प्रेम करायचे. त्यांचे अमळनेरचे न्यू प्लाट एरियातलं घर म्हणजे फक्त घर नव्हते. ते अनेकांसाठी स्नेहालय होतं. प्रेमाला होतं. इथं साहित्यिकांच्या मैफली रंगायच्या. मैफलितले क्षण हसरी झुंबरं व्हायची. तात्यांचं अवघं जगणं पू. सानेगुरुजीमय झालेलं होतं. ते अनेकांचे आधार झाले होते. अनेकांच्या पोटाची आणि ज्ञानाची तात्यांनी भूक भागवली. ते ही, या हातचे त्या हाताला कळू न देता. अनेकांना अक्षर ओळख दिली. अक्षर श्रीमंत केले. तात्यांचा हा समृध्द वारसा त्यांचे सुपुत्र चेतन सोनार, सुकन्या अनुराधा, अभयाताई श्रध्देने जपत आहेत. त्यांना यशोदाआईंनी दिलेली निस्वार्थ, निरपेक्ष साथ, साहित्याचा हा दिव्य डोलारा पेलणार होती. तात्यांचं मुक्ताई म्हणजे सेवा दलाचा श्वास होतं. आहे.

मी झुमकराम सार्वजनिक वाचनालयाचा अध्यक्ष असतांना, पू. साने गुरुजींच्या पुण्यतिथीनिमित्त तात्यांचं जाहिर व्याख्यान आयोजित केलं होतं. तात्या व्याख्यानाला आले. येतांना सोबत मॅटेडोर भरुन पुस्तकं घेवून आले. आम्ही वाचनालयात त्याचं प्रदर्शन भरवलं.

तात्या गुरुजींवर भरभरुन बोलले. त्याच्या बोलण्यातून त्यांची, गुरुजींवरील भक्ती, प्रीती आणि आस्था बाहेर पडत होती. गुरुजींचं अमळनेरात स्मारक व्हावं हा त्यांचा ध्यास होता. त्यासाठी ते प्रयत्न करत होते. जनमानसात ती भावना निर्माण करत होते. गुरुजी घरोर पोहचावेत यासाठी त्यांनी गुरुजींचं एक देखणं छायाचित्र, कॅलेंडर, पोष्टर प्रकाशीत केले होते. ते शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालयात ते, स्वतः पोहचवत होते. दिवसभराचा कार्यक्रम संपल्यावर, पुस्तक प्रदर्शनात फार थोडी पुस्तक विक्री झाल्याचे लक्षात आले. आवराआवर करतांना, मी हिरमुसला झालो. जास्त पुस्तक विक्री न झाल्याची खंत मला बोचत होती. ती ओळखून तात्या म्हणाले, "चौधरी, पुस्तकं विकणं हा माझा व्यवसाय असला, तरी तो माझा धंदा नाही. लोकांनी पुस्तकं घ्यायला हवीत. वाचायला हवीत हे मलाही वाटतंच. मात्र, त्यांनी ती घेतली नाहीत म्हणून नाराजही होवू नये. अनेकांनी पुस्तकं हातात घेतलं. ती न्याहाळली. पानं उलटून बघितली. पुस्तकांचा सुगंध घेतला. हे देखील मला आनंद देणारंच आहे. हा स्पर्श, हा सुगंध त्यांना एक दिवस पुस्तकांपर्यंत ओढून आणेल. पुस्तकं खरेदी करायला भाग पाडेल, याची मला खात्री आहे." असं म्हणत ते निर्विकार मनाने पुस्तकं गाडीत ठेवू लागले. आम्हीही त्यांना मदत केली. आणि, ते हसतच निघून गेले. कोणतंही मानधन न घेता. मी पू. साने गुरुजींना प्रत्यक्ष पाहिलेलं नाही. मात्र, ते वारातात्यांसारखेच असावेत, हा विश्वास मला त्यांच्या सानिध्यातून मिळाला आहे.

वारातात्या, अर्थात वासुदेव रामदास सोनार यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९३३ चा. त्यांचे वडील गिरणी कामगार होते. ते चार वर्षाचे असतांनाच त्यांच्या आईने या जगाचा निरोप घेतला. शिक्षण पूर्ण झाल्यावर, सुरुवातीला तीन चार वर्षे त्यांनी प्रताप महाविद्यालयात नोकरी केली. नंतर एलआयसी मध्ये विकास अधिकारी म्हणून सन १९९२ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. दरम्यान मराठी भाषेतवरील प्रेम आणि प्रभूत्व असल्याने त्यांनी, ९ ऑगस्ट १९७२ ला, कविवर्य कुसुमाग्रजांच्या हस्ते चेतश्री प्रकाशाची मुहूर्तमेढ रोवली. चेतनश्री प्रकाशाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील व खानदेशातील नामवंत लेखकांची प्रथम पुस्तके प्रकाशित करण्यात आली. चेतश्री प्रकाशनाने ४० वर्षात ५३० पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. त्यात महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी विविध पुरस्कारही मिळालेले आहेत. सन १९९१ यावर्षी, चेतश्री प्रकाशनाच्या नऊ पुस्तकांना पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र राज्य शासनाचे एकाच वेळी, एकाच प्रकाशाला पुरस्कार मिळणारी चेतश्री ही एकमेव प्रकाशन संस्था म्हणून गौरवण्यात आली होती. यात प्रथम पुस्तक प्रकाशन म्हणून महाराष्ट्रातील नामवंत लेखक प्रभाताई अत्रे यांचे स्वरमयी, सुनील माई यांचे खुराळा, दीपक चैतन्य यांचे चाहूल, तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांचे जॉन आणि अंजिरी पक्षी, प्राचार्य सुलभाताई भानगावकर यांचे लव्हेबल आणि याशिवाय अन्य नामवंतांची पुस्तके प्रकाशित झाली होती. ज्यात पूज्य साने गुरुजी, कवी कुसुमाग्रज, यदुनाथ थत्ते, दादा धर्माधिकारी, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉक्टर वि. भा. कोलते प्राचार्य राम शेवाळकर आणि अनेक नामवंतांची पुस्तके आहेत.

व्यक्तिगत वारातात्यांनी देखील विपुल असं साहित्य लेखन केलेलं आहे. त्यांनी कथा, कविता, ललित, व्यक्तचित्रे, नाटक, एकांकिका, विनोदी साहित्य समीक्षा, वैचारिक लेख, बालसाहित्य तसेच इतर अनेक प्रकार लीलया हाताळले आहेत. त्यांची अनाद. नितांत माझी प्राण भक्ती, तुकयादारी. अक्षरवारी हे कवितासंग्रह आणि अंगावर, अंधार हे दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले होते. ज्यांनी त्याकाळी प्रचंड लोकप्रियता अनुभवली. तात्यांनी, इथलेच जळ इथलीच माती, मुरुदगान, चरण स्पर्श. अक्षरांचे घरी आणि आम्ही भारतीय इत्यादी ललित तसेच व्यक्तिचित्रणात्मक लेखनही केलेले आहे. बुडत्याचे पाय खोलात, येरे घना, हसरे झुंबर, फ फजितीचा असे नाटक आणि एकांकिका देखील तात्यांनी लिहिल्या. तात्यांच्या लेखनामध्ये सर्वंकषता असल्यामुळे, त्यांना विनोदाचेही वावडे नव्हते. बाबल्याची कढई, चेष्टिका, हसरे अक्षरे या त्यांच्या विनोदी साहित्य कृती जनमानसात आपली स्वतःची वेगळी ओळख जपून आहेत. यती यदुनाथ हे त्यांचे वैचारिक पुस्तक, तसंच दारे देवाची, जनुकाका, दुबळी माणसं ही बालवाचकांसाठीची पुस्तकं देखील तात्यांनी लिहिली आहेत .

तात्यांचा साहित्य क्षेत्रातील वावर बघतात विविध संस्था मंडळ यावर देखील त्यांनी काम केलेले आहे. अमळनेर मध्ये साहित्य संस्कार रुजवणारे मराठी वांग्मय मंडळाचे तात्या अध्यक्ष आणि कार्यवाहक राहिले होते. शहरातील समृद्ध अशा पूज्य साने गुरुजी ग्रंथालयाचे ते कार्यवाहक होते. महाराष्ट्र साहित्य परिषद अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघटना, राष्ट्रसेवा दल, ग्रंथ चळवळ या संस्थांशीही त्यांचा जवळून संबंध होता. तात्यांनी लिहिलेली विनोदी मालिका आकाशवाणीवरूनही प्रकाशित झालेली आहे. वेळोवेळी विविध वृत्तपत्रातून त्यांनी विपुल लेखन केले होते. शाळा व महाविद्यालयांमध्ये मोठ्या संख्येने व्याख्यान भाषण केली आहेत. तात्यांनी १५ सप्टेंबर २००४ ला या जगाचा निरोप घेतला. मुक्ताईचा संत-शब्दयात्री अनंताच्या प्रवासाला निघून गेला. चेतश्रीचा रथ थांबला. तो पुन्हा गतीमान व्हावा. नवलेखकांना त्याने हक्काचं व्यासपीठ द्यावं हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. तात्यांच्या आठवणींच्या अत्तरक्षणांनी माझी लेखन वाटचाल सदा सुगंधीत रहावी, हीच त्यांना शब्दांजली !

आधुनिक केसरी




**खान्देशातील साहित्य पंढरीचे वारकरी, साहित्यिक तात्यासाहेब वारा सोनार म्हणजे, खानदेशचं सात्विक, साहित्यिक संचित. त्यांनी साहित्यातील सर्व प्रकार लीलया हाताळत, महाराष्ट्रातील अनेक साहित्य प्रभूंच्या शब्दांना, आपल्या चेतश्री प्रकाशनामार्फत, महाराष्ट्रातील मराठी रसिक वाचकांपर्यंत पोहोचवले. त्याकाळी अंमळनेरातील चेतश्री प्रकाशन म्हणजे, मान्यवर साहित्यिकांसाठी साहित्य पंढरीच होते. या ठिकाणी त्या काळातील अनेक दिग्गज साहित्यिकांनी हजेरी लावली होती. त्यांच्या लेखणीतून खानदेशी माय मातीची संस्कृती आणि व्यक्तिचित्रे ठळकपणे समाजासमोर आली. तात्यांच्या लिखाणात जी प्रासादिकता होती, तीच त्यांच्या जगण्यातूनही ओतप्रोत भरलेली होती. पूज्य साने गुरुजींचा संस्कार असलेला आणि त्यांच्या विचारांचा प्रचार, प्रसार करण्यासाठी, आयुष्यभर झटणारा हा माणूस, पूज्य साने गुरुजींच्या धडपडणाऱ्या लेकरांपैकीच एक होता, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. वारातात्या, ना. धो. महानोर आणि पुरुषोत्तम पाटील या त्रयींनी अवघा खान्देश, आपल्या शब्दसामर्थ्याने कवेत घेतला होता. या शब्दप्रभूंनी, सुरवातीच्या काळात, माझ्या साहित्य लेखनाला प्रेरणा दिली. आम्ही राबवत असलेल्या साहित्य कला मंच, या संस्थेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या बालकवी पुरस्कार वितरणासाठी, या तिन्ही दिग्गजांनी उपस्थिती देऊन, आमच्या पाठीवर हात ठेवला. आधार देत लढ म्हणाले. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत हा विश्वास दिला. म्हणूनच, आमची साहित्यिक वाटचाल आजच्या घडीला, यशाच्या पायरी जवळ उभी आहे. मला माहित आहे की, हे यशाच अंतीम, सर्वोच्च टोक नाही. हा थांबाही नाही. हा एक पडाव आहे. मात्र, या पडावा पर्यंत पोहोचवण्यासाठी, वारा तात्यांनी दिलेले बळ, त्यांनी दाखवलेली दिशा, त्यांच्यासोबत चाललेलो काही पाऊलं, आज मागे वळून बघतांना मला साद घालत आहेत. स्मृतीगंध उधळीत आहेत. त्यांच्यासोबत घालवलेले क्षण, हे माझ्या जीवनातील अत्तरक्षण झाले आहेत. त्यांचा सुगंध, वेळोवेळी माझी सोबत करतो. मला मंत्रमुग्ध करतो. प्रसन्नता देतो आणि पुन्हा नवीन शब्द-पाऊल टाकण्यासाठी बळही देतो.**



बालकवी त्र्यंबक बापूजी ठोमरे यांना अभिवादन करतांना वारातात्या सोनार. सोबत ना. धो. महानोर, पुरुषोत्तम पाटील, विजय चोरमारे, डॉ. संजीवकुमार सोनवणे, प्रा. बी.एन.चौधरी, विजयचरण गुप्ता

# ई पीक पाहणी ऑनलाईन अर्ज भरताना होणारी लूट थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** एकीकडे सरकारची ओल्या दुष्काळा बाबत छत्रपती संभाजीनगर बाबत असलेली उदासीनता तर दुसरीकडे शेतकर्यांना अतिवृष्टीचे आसमानी संकटं. गेल्या ३ वर्षापासून गंगापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे खरीपाच्या पिकांचे नुकसान होत असताना पीक विमा नाही ,औला दुष्काळ अनुदान नाही परंतु केंद्र व राज्य सरकारचे online अर्ज भरून घेण्यासाठी चढाओढ दिसुन येत आहे.

हजारो कोटी रूपये खर्च करून जाहीरात करून सरकार पिक विमा भरा, ई पिक पाहणी करा, पी एम किसानचे अपडेट करा, पीककर्ज online करा अशी सर्व कामे करण्यासाठी अशिक्षित शेतकर्यांना csc वर अवलंबून रहावे लागत आहे. खर तर csc सेंटर प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालय उपलब्ध आहेत व ग्रा. पं.कडे संगणक सहाय्यक असताना ग्रा.पं. किवा स्थानिक लोकप्रतिनिधी कडुन शेतकर्यांच्या हिताकडे दुर्लक्ष होत असल्याने इतर खाजगी csc चालक किंवा अनाधिकृत स्वयंघोषित csc चालकांकडून शेतकर्याची पिक विमा भरताना, ई पिक पाहणी करताना तसेच इतर कामासाठी १०० रूपया पासुन ते अवाच्या सवा पैसे घेऊन लुट केली जात असल्याची बाब डोणगाव मंडळात समोर आली आहे. तसेच अनेक मंडळात वेळोवेळी शेतकर्याची लुट होत असल्याच्या तक्रारी शेतकरी नेते इंजी महेशभाई गुजर यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर csc चालक किवा अनाधिकृत स्वयंघोषित online करणार्याच्या माध्यमातून लुट थांबण्याची मागणी गंगापूर तालुक्यातील शेतकर्याच्या वतीने email द्वारे इंजी महेशभाई गुजर यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.




एकीकडे केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजनाचे अर्ज online मागवले जातात व दुसरीकडे ग्रामसेवक,तलाठी,कृषी अधिकारी यांचे सर्व कामे online झाल्याचे सरकार प्रशासन अभिमानाने सांगते .मग दरवेळी सर्वसामान्य शेतकरी नागरिकांना खाजगी csc चालकांवर का अवलंबून रहावे लागते याचा विचार सरकारने करायला हवा .उलट एकदा दिलेली माहीती कागद पत्रे online साठवून ठेवून जेव्हा गरज पडेल तेव्हा परवानगी घेऊन विविध अर्ज,योजनेसाठी वापरता येईल अशी सुविधा सरकारने उपलब्ध करून होणारी लुट थांबवी .

–इंजी . महेशभाई गुजर शेतकरी कार्यकर्ते

खर तर ई पिक पाहणी,एक तर विमा कंपनी, कृषी सहाय्यक यांनी मोफत किवा स्वत: ई पिक पाहणी ॲपच्या माध्यमातून करायला हवी परंतु अशिक्षित भोळ्या भावड्या शेतकर्यांकडे साधे मोबाईल असल्याने,त्यांना Csc चालकावर अवलंबून रहावे लागते . त्यामुळे त्यांची अवैध रित्या पैसे घेऊन लुट केली जाते . .

–भगवान आघाडे
धामोरी खुर्द

# प्रत्येक गावाचा रावणगावसारखा विकास झाला पाहिजे : डॉ. ठोंबरे



आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** काम करण्याची इच्छा असली की काहीही साध्य करता येते. गांव सुंदर, स्वच्छ करून प्रत्येक गावाचा रावणगांव सारखा विकास झाला पाहिजे असा आशावाद व्यक्त करून रावणगांवच्या विकासाबदल जिल्हा परिषदेचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे यांनी गोरोदगार काढले.
रावणगाव ग्राम पंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाल्याने या सन्मानपत्राचा वितरण सोहळा, व सरपंच आणि ग्रामसेवक यांची कार्यशाळा दि. १५ सप्टेंबर रोजी रावणगांव येथे आयोजीत करण्यात आली होती यावेळी ते ठोंबरे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प. माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर होते.

प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार राजेश लांडगे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी सभापती प्रकाश देशमुख भोसीकर, गटविकास अधिकारी अमित राठोड ,संचालक सुभाष पाटील किन्हाळकर, रामचंद्र मुसळे, माधव अमृतवाड, आयएसओ ट्रेनर अनिल येवले, उपसरपंच सौ.सुक्ष्मा आनंदराव कदम, आनंदराव पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना डॉ. ठोंबरे म्हणाले की, रावणगाव येथील ग्रामपंचायतीची विकासाकडे वाटचाल सुरू आहे.

> अध्यक्षीय समारोपात बाळासाहेब पाटील रावणगावकर म्हणाले की, सरपंच ते जिल्हा परिषदेच्या सभापती पर्यंतच्या कार्यकाळात भूमीपुत्र म्हणून रावणगावचा विकास केला आहे . माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून तालुक्याच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न केला आहे .

त्यांनी ग्रामपंचायतीच्या विकास कामाची प्रशंसा केली. ग्रामपंचायतीच्या कार्यात पारदर्शकता येण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी आयएसओ मानांकन मिळविण्याकरीता पुढाकार घ्यावा असे आव्हान केले. कार्यशाळेत तहसीलदार राजेश लांडगे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, प्रकाश देशमुख भोसीकर, माधव अमृतवाड, सुभाष पाटील किन्हाळकर, गटविकास अधिकारी अमित राठोड, अनिल येवले यांनी मार्गदर्शन केले .प्रास्ताविकात ग्रामविकास अधिकारी माधव ढगे यांनी गावातील विकासात्मक कामाची माहिती दिली.

यासाठी प्रशासनातील अधिकारी ,लोकप्रतिनिधी आणि लोकांचे मोठे सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील काळात स्मार्ट व्हिलेज स्पर्धेत रावणगावला प्रथम क्रमांक मिळेल कसा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन रंगराव कासारे यांनी केले. कार्यक्रमास तालुक्यातील सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वृद्धाश्रमात औषधी व फळवाटप करून वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** मातंग एकता आंदोलनाचे युवक आघाडी सिल्लोड तालुकाध्यक्ष विशाल आहिरे व तालुका उपाध्यक्ष सुरेश चंदनशिव यांचा वाढदिवस अत्यंत अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. जन्मदिनी कुठलाही अवाढव्य खर्च न करता सिल्लोड तालुक्यातील चिंचपूर या गावी असलेल्या वेणूताई वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत गोड जेवण करुन व त्यांना लागणारे सर्व औषधी व फळवाटप करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, वृद्धाश्रमाचे अध्यक्ष साहेबराव दणके, जिल्हा प्रवक्ता गजानन मानकर, सामाजिक कार्यकर्ते, जिल्हा संघटक भरत मानकर, संभाजीनगर पूर्व तालुकाध्यक्ष राहुल अंभोरे, ग्रा.पं. सदस्य तथा तालुका सरचिटणीस शिवदास दणके, दगडू दणके, सोनाबाई दांडगे, बिजूबाई जंजाळ, पार्वताबाई रोकडे, वेणूताई दणके, अमोल साळवे, परमेश्वर दणके ज्योती दणके, पूजा दणके, गंगा दणके, बबन दणके, मंगरुळचे शाखाध्यक्ष गणेश दणके, सचिन चाबुकस्वार, लक्ष्मण दणके, जनार्दन दणके, अमोल मोजे आदींची उपस्थिती होती. यांवेळी डॉ.राजीव वरपे आणि त्यांचे सर्व सहकारी डॉक्टर यांनी वृद्धाश्रमातील रुग्णांवर उपचार केले.

## धक्कादायक घटना

# चोरट्यांनी चोरला हनुमानाचा डोळा..!

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जिल्हात, शहरात चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. धुळे शहरातील अनेक भागात चोरट्यांचा वावर वाढला आहे. चोरट्यांनी आता बंद घरानंतर मंदिर आणि दर्गाकडे आपला मोर्चा वळवला आहे. बेलगाम झालेल्या चोरट्यांना पोलिस जेरबंद कधी करणार असा प्रश्न आता नागरिक विचारत आहे.

धुळे शहरातील साक्री रोड भागात असलेल्या मोगलाई परिसरामधील महाले नगरात श्री. दक्षिण मुखी हनुमान मंदिरात काल रात्रीच्या सुमारास अज्ञात समाजकंट चोरट्यांनी शहरातील सामाजिक वातावरण दूषित करण्याचे हेतूने हनुमान मंदिरात असलेल्या मूर्तीचा चांदीचा डोळा चोरून नेत मूर्तीची देखील विटंबना केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आज सकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन संबंधित समाजकंटक चोरट्यांना जेरबंद करण्याची मागणी केली आहे. हिंदू धर्माचे प्रेरणास्थान असलेल्या हनुमान मूर्तीचा चांदीचा डोळा चोरुन हिंदू बांधवांच्या भावनेला ठेच पोहोचवण्याचे कृत्य या अज्ञात चोरट्यांनी केले आहे.

चोरट्यांनी मूर्तीला काळं लावलं असल्याचं दिसून आलं आहे. यापूर्वी देखील याच हनुमान मंदिरातील दानपेटी पेटवण्याचा देखील प्रयत्न झाला होता. मात्र, या भागातील हिंदू बांधवांनी सामाजिक वातावरण बिघडू नये म्हणून सदर प्रकरण समजून शांत केले होते. मात्र, पुन्हा पुन्हा असे प्रकार होत असतील तर आम्ही शांत बसणार नाही असा पवित्र या परिसरातील नागरिकांनी घेतला.

हिंदू धर्मियांचे पवित्र उत्सव असलेले नवरात्र, दसरा, दिवाळी हे सण तोंडावर असताना अशा पवित्र वातावरणात जर कोणी जाणून-बुजून हिंदू धर्मियांच्या भावनाला ठेच पोहोचवण्याचे काम करणार असेल तर आता आम्ही अशा विकृतींच्या विरोधात कायदेशीर लढाई लढण्यास तयार आहोत. अशी प्रतिक्रिया देखील परिसरातील नागरिकांनी यावेळी दिली.आता धुळे शहरातील या चोरट्यांचा पोलीस प्रशासन कशाप्रकारे बंदोबस्त करते, आणि धुळे शहरातील महाले नगरात झालेल्या हनुमान मंदिरात झालेला प्रकार किती गांभीर्याने घेते हे देखील येणाऱ्या काळात बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# सुकन्या समृद्धी योजना महोत्सवात सहभागी व्हा : आशीष इंगळे

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** भारतात विश्वसनीयतेच्या कसोटीवर यशस्वीपणे मार्गक्रमण करीत असलेले खाते म्हणजे भारतीय डाक विभाग आहे . नागरिकांच्या सुविधेसाठी विविध प्रकारच्या विशेष योजना आमलात आणल्या जातात . त्यातील सार्वधिक लोकप्रिय आणि सार्वधिक परतावा देणारी योजना म्हणजे सुकन्या समृद्धी योजना होय . या योजनेची उदिष्टे अशी आहेत. की, सुकन्या समृद्धी खाते प्रत्येक मुलींला स्वतः चे आयुष्य जगण्याची आणि स्वप्ने साध्य करण्याची संधी उपलब्ध करून देते. या योजनेच्या लाभार्थींना दरवर्षी व्याजदर ७.६ (१-०४-२०२० पासून लागू) वार्षिक चक्रवाढ, व्याजाची गणना वार्षिक आधारावर केली जाते. किमान २५० रुपये भरून आपण खाते उघडू शकतो, दहा वर्षाखालील मुली चे खाते उघडू शकतो , एका वर्षात २५०ते १५००० पर्यन्त सुकन्या समृद्धि योजना रक्कम जमा करू शकता , परिपक्वता २१वर्षे आहे. या खात्यातून मुलीच्या लग्न किंवा शिक्षणाकरिता ५०% रक्कम काढू शकता. ३० सप्टेंबर पर्यंत नागरिकांनी जास्तीत जास्त आपल्या मुलींचे खाते काढून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन चिखली पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्टर आशिष इंगळे यांनी केले आहे.

# देव्हारी येथील साठवण तलावाकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील देव्हारी येथील धरणाच्या भिंतीवर झाडे झुडपे वाढली असून त्यामुळे भिंतीला तडे जाण्याचा धोका निर्माण झाला आहे गावावर मोठी आपत्ती येण्यापूर्वी उपाय योजना करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांची व परिसरातील लोकांची आहे

धरणाचे काम 9 ते 10वर्ष पूर्ण होऊन ही या धरणाच्या निर्मितीपासून भिंतीवर व स्वभाव ताली उगवलेली झाडे आता मोठी झाली आहे त्यामुळे ही झाडे तोडण्याची गरज आहे मात्र झाडे तोडण्याकडे व नष्ट करण्याचे काम सदर विभागाकडून करण्यात आले नाही असे प्रत्यक्षदर्शी समजते या झाडा झुडपांच्या मुळ्या भिंतीवर खोलवर गेल्या आहे काळ्या मातीची भिंत असल्याने या भिंतीला मोठमोठ्या झाडांच्या मुळ्या मुळे मोठ मोठाले तडे जात आहे. पाण्याचा साठा वाढल्यावर भिंत फुटण्याचा धोका असल्याने अतिरिक्त झाडे तोडण्याची मागणी गावकरी करत आहे हे भिंत फुटल्यास गावाला धोका निर्माण होऊ शकतो सध्या पावसाळा असल्याकारणाने सध्या झाडे तोडणे थोडे अवघड आहे हे काम उन्हाळ्याच्या दिवसात झाडे कापण्यास सोयीस्कर होते पण पाटबंधारे विभागातील कर्मचाऱ्यांचे व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आज गावावर मोठे संकट येऊ शकते संबंधित पाटबंधारे विभाग यांनी लवकर हे झाडे तोडावी व धरणाला तडे पडण्यापासून वाचवावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# मराठा समाजावर घृणास्पद व आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या पोलिस निरीक्षकास बडतर्फ करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोड :** जळगावचे स्थानिक गुन्हा शाखेच्या एका पोलिस निरिक्षकांनी गणेश उत्सवातच्या काळात त्यांच्या एका सहकार्यसोबत दुरव्धनीवर मराठा समाजाविषयी अंत्यत घृणास्पद व आक्षेपार्ह वक्तव्य केल्याची ऑँडिओ क्लिप व्हायरल झाली त्यांनी मराठा समाजाच्या भावना दुखविले असल्याने त्या अधिकाऱ्यांस बडतर्फ करण्यात यावे यासाठी मराठा बांधवाकडून पैठणचे उपविभागीय अधिकारी डॉं. विशाल नेहूल यांच्याकडे शुक्रवारी (दि.१६)रोजी निवेदन देण्यात आले.

या निवेदनात असे म्हटले की, गणेश उत्सवात काळामध्ये जळगावचे स्थानिक गुन्हा शाखेचे अधिकारी किरणकुमार भगवानराव बकाले पोलीस निरीक्षक जळगाव रा. अधिकारी निवास पो.मु. जळगाव हे एक शासकीय अधिकारी असून त्यांच्या कडे समाजात कायदा सुव्यवस्था व शांतता नांदावी व समाज सुधारण्यासाठी त्यांच्या हाती शासनाने अधिकार दिलेले आहे. परंतु, जर या अधिकाऱ्यांच्या डोक्यात असे जातीभेद व जाती बद्दल अशें संकुचित विचार असेल तर अशा प्रकारचे अधिकारी समाजासाठी घातक असून अशा अधिकाऱ्यांच्या हाती कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदारी देणे हे सर्व समाज व मानवजातीसाठी धोकादायक असून अशा अधिकाऱ्यास निलंबित करुने उचित नसून या अशा दुष्ट प्रवृत्तींना कायमचे सेवेतून मुक्त करून समाजात भेद निर्माण होणार नाही. याची खबरदारी घ्यावी कारण त्यांनी आपल्या सहकारी अंमलदाराशी फोनवर बोलतांना मराठा समाजाबद्दल अतिशय घृणास्पद व आक्षेपार्ह वक्तव्य केले असून त्यांनी मराठा समाजामध्ये द्वेषाच्या व दुष्टत्वाच्या भावना वाढविण्याचा प्रयत्न करुन सार्वजनिक शांतता बिघडविण्याचा प्रयत्न केला. अशा दुष्ट प्रवृत्तीच्या व समाज विघातक असणाऱ्या व्यक्तींस समाजात तेढ निर्माण करणाऱ्यावर व मराठा समाजावर जात धर्मांच्या अश्लिल शब्दांचा उच्चार करुन त्यांना लज्जा बोले आहेत. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलिस निरिक्षक किरणकुमार भगवानराव बकाले यांना निलंबित करण्याऐवजी बडतर्फ करण्यात यावे यासाठी पैठण विभागीय अधिकारी डॉं. विशाल नेहूल, सहाय्यक पोलिस निरिक्षक गणेश सुरवसे यांच्याकडे पाचोड ठाण्यातं निवेदन देण्यात आले असुन या निवेदनावर धनराज भुमरे, प्रभाकर भुमरे, शिवाजी पाचोडे, दत्ता भुमरे, युवराज चावरे, अंगद लेंभे, विजय चिडे, अभिषेक भुमरे आदींच्या स्वाक्षरी आहेत.



पैठणचे विभागीय अधिकारी डॉं. विशाल नेहूल, सहाय्यक पोलिस निरिक्षक गणेश सुरवसे यांना निवेदन देतांना प्रभाकर भुमरे, धनराज भुमरे सह आदी मराठा बांधव. (छाया-विजय चिडे)

# लालबागच्या राजाला भरभरून दान


## ६० लाखांचा मोदक, ८ लाखांचा हार; लिलावातून १.२५ कोटींची कमाई

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** यंदा गणेशोत्सव थाटामाटात पार पडला. दोन वर्ष करोनामुळे सण-उत्सव साजरे करण्यावर अनेक निर्बंध होते. सार्वजनिक गणेशोत्सवात अनेक मर्यादा घालण्यात आल्या होत्या. मात्र यंदा बाप्पाचं वाजत-गाजत आगमन झालं आणि बाप्पाला मोठ्या उत्साहात निरोपही देण्यात आला. मुंबईतील गणेशोत्सवात सर्वात आकर्षणाचं केंद्र असलेल्या लालबागच्या राजाचा आगमन सोहळा आणि विसर्जन मिरवणूक उत्साहात पार पडली. यंदा कोणतेही निर्बंध नसल्याने राजाच्या चरणी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

लालबाग राजाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली. त्याशिवाय अनेकांनी लालबाग राजाच्या चरणी मोठं दानही केलं आहे. मोठ्या प्रमाणात भाविकांनी सोनं-चांदी दान केलं आहे. बाप्पाचं विसर्जन झाल्यानंतर आता भाविकांनी दिलेल्या दानाचा लिलाव करण्यात आला आहे. या लिलावात अनेकांनी बोली लावली असून यातून मंडळाने १.२५ कोटी रुपये कमावले आहेत. तर एकूण कमाई ६.२५ कोटी रुपये इतकी झाली आहे.

लालबाग राजा मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब साळवे यांनी सांगितलं, की यंदा १.२५ कोटी रुपये कमाई झाली आहे. हा आकडा २०१९ मध्ये झालेल्या लिलावातील बोलीइतका आहे. लिलावाशिवाय लालबाग राजाच्या चरणी ५ कोटींहून अधिक रोख रक्कम दान करण्यात आली आहे. त्यामुळे यंदा गणेशोत्सवातील लालबाग राजाची एकूण कमाई ६.२५ कोटी रुपये इतकी आहे. लालबाग राजाला आलेल्या दानाचा लिलाव १५ सप्टेंबर रोजी झाला. या लिलावात १.२५ किलो वजनाचा मोठा सोन्याचा मोदक ६०.०३ लाख रुपयांना बोली लावून विकला गेला.





लालबाग राजा मंडळाचे कोषध्यक्ष मंगेश दळवी यांनी सांगितलं, की एक मोठा अतिशय सुंदर सोन्याचा हार ८.५५ लाख रुपयांना विकला गेला आहे. तर दुसरा आणखी एक सोन्याचा हार ३.२० लाख रुपयांना विकला गेला. एक किलो सोन्याच्या बिस्किटाची ५.७७ लाख रुपयांना विक्री झाली. लालबाग राजाला भेट म्हणून दिलेली एक बाईक एका खरेदीदाराने बोली लावत ७७००० रुपयांना विकत घेतली.

यावर्षी लालबाग राजाला आलेल्या दानात अनेक प्रकारच्या सोने-चांदीच्या वस्तू दान करण्यात आल्या आहेत. गोल्ड प्लेटेड लालबाग राजाच्या पादुका, अनेक देवतांच्या सोन्याच्या मूर्ती, सोन्याचे लहान-मोठ्या आकाराचे अनेक मोदक, चांदीच्या समई, मौल्यवान धातूच्या दुर्वा, चांदीचे हार, बाप्पाच्या बोटातील सोन्याच्या अंगठ्या, दागिन्यांच्या विविध वस्तू अशा अनेक गोष्टींच दान करण्यात आलं आहे. गुरुवारी २२ कॅरेट सोन्याचा दर ४६,२०० रुपये प्रति तोळा इतका होता, तर २४ कॅरेट सोन्याचा दर ५०,४०० रुपये प्रति १० ग्रॅम होता. एक किलो चांदीचा भाव ५७००० होता.

यावर्षी राजाला आलेलं दान काहीसं कमी झाल्याचं बोललं जात आहे. गणेशोत्सव काळात २४ कॅरेट सोन्याचा दर ५२००० रुपये प्रति १० ग्रॅम होता, त्यामुळे यात कमी होऊ शकते. तसंच यंदाची एकूणच महागाई हेदेखील यामागचं कारण असल्याचं लालबाग राजा मंडळाचे कोषध्यक्ष मंगेश दळवी यांनी सांगितलं. शेवटच्या तीन दिवसांत दानात वाढ झाली. या तीन दिवसांत अंदाजे ५.५ किलो सोनं आणि ६० किलो चांदी इतकं दान करण्यात आलं.

२०१८ मध्ये लालबाग राजाला ८ कोटी रुपये दान आलं होतं. या रोख रकमेसह ५.५ किलो सोनं, ७५ किलो चांदी इतकं दान करण्यात आलं होतं. तर, २००८ या लालबाग राजाच्या ७५व्या वर्धापनदिनी सर्वाधिक एकूण उत्पन्न ११.५ कोटी इतकं झालं होतं. यावर्षी लालबाग राजाचं ८९वं वर्ष होतं. मागील दोन वर्षात करोनामुळे लालबाग राजाला आलेल्या दानाचा लिलाव करण्यात आला नव्हता. २०२० मध्ये करोना काळात या मंडळाने रक्तदान शिबिर, प्लाझ्मा कलेक्शन कॅम्प अशा प्रकारचे उपक्रम राबवले होते.



# सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ पैठण अध्यक्षपदी विलासबापु भुमरे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील ३९ वर्षाची परंपरा असलेल्या सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी माजी सभापती विलासबापु भुमरे,तर कार्याध्यक्ष जितसिंग करकोटक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

पैठण शहरातील मार्केट कमेटी येथे संस्थापक अध्यक्ष रतनशेट गारदे,सोमनाथ टाक यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली.

पैठण शहरातील बाजार तळ येथील सार्वजनिक नवरात्र उत्सवाचे यंदाचे ४० वे वर्षे आहे. यानिमित्ताने होणार्या नवरात्र उत्सवात रास दांडीया तसेच मंनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असुन यात भरघोस बक्षिसे राहणार आहेत. यावेळी शंकर सपकाळ, लक्ष्मण सपकाळ, सुरेश शेळके, शहादेव लोहारे, डिगंबर ढवळे, सोमनाथ गायकवाड, सोमनाथ पोपळघट, दिप्तीमान देशमुख, किरण जाधव, महेश पवार,अमोल सपकाळ, रोहित वाघमारे, सुमित पोटे, अक्षय पाटील, संदीप आहेर, विकी खांडेकर, प्रशात जगदाळे, वंसत ताकटे, गोकुळ खांडेकर, अजय सपकाळ, शिवम परदेशी, विष्णु खंडागळे याची उपस्थिती होती.

# लासूरला रंगले चिमुरड्यांचे चित्रप्रदर्शन, सरपंच मीना पांडव यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन, तालुका गंगापूर येथील चित्रकला स्पर्धा आयोजन समिती च्या वतीने चित्रकला स्पर्धा व चित्र प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून येथील चित्रकला स्पर्धा आयोजन समितीचे वतीने शालेय विद्यार्थी व नागरिक यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली तर सर्व सहभागी स्पर्धकांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.



तीन गटांत स्पर्धा संपन्न झाली, पहिली ते चौथी या अ गटात प्रथम महेक इरफान शेख, द्वितीय कल्पेश किरण कदम,तृतीय पूर्वी पंकज जैस्वाल तर उत्तेजनार्थ खुशी रवी दिवेकर व श्रीहरी शिवाजी कदम, ब गटात प्रथम महेश्वरी अंकुश डोके, द्वितीय तेजस्वी पोपट दळे,तृतीय रोहित गणेश शेजूळ,चतुर्थ अनुष्का सतिष जगताप तर उत्तेजनार्थ शर्वरी रविकिरण संगेकर, काशिष विकास ठोळे व अबूजर नजीर शहा, खुल्या गटातून प्रथम कृष्णा विष्णू देवकर, द्वितीय श्रुती राहुल शिरसाठ,तृतीय मयुरी जनार्दन सोमसे, उत्तेजनार्थ ज्ञानेश्वरी काकासाहेब चव्हाण व प्रवीण राजू दिवे यांनी रोख बक्षीस, प्रमाणपत्र व सन्माचिन्ह पटकावले. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच मीनाताई पांडव, सूनिताताई पाटणी, संजय पांडव, ज्ञानेश्वर वाघचौरे, डॉ. विकास संगेकर, गणेश व्यवहारे, सुरेश जाधव, राजू गायकवाड, अशोक सौदागर, कल्याण पवार, गुलाब वाघ, सलीम शहा, सुनील पाखरे, भास्कर बनसोडे, फिरोज मंसुरी, छोटू पठाण, प्रशांत देसाई, यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी आयोजन समिती सदस्य प्रा.शशिकांत सांगवीकर, प्रशांत दाभाडे, अम्मु शेख, रवी सोनवणे, सुरेश साळुंखे, कल्पेश गायकवाड, वसीम शेख, प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत देसाई, शिक्षक विठ्ठल नरोडे, अरविंद तुपे, शिक्षिका मेघा घोडके यांनी परिश्रम घेतले.

# कन्नड शहरातील उद्योजक, समाजसेवक मनोज पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थिनींना शालेय साहित्य वाटप व व्याख्यानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शालेय जीवनानंतर माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असतानाच आपल्याला पुढील आयुष्यात काय करायचे आहे. या बाबीचे नियोजन करता आले की त्या दिशेने वाटचाल करणे सोपे जाते दहावी नंतर पुढे काय हा प्रश्न निर्माण होत नाही, दहावीतील सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे वय सोळा असते आणि सोळाव वरीस धोक्याचं असं नेहमी म्हणले जाते मात्र हे वय धोक्याचे नाही तर मोक्याचे असते असे प्रतिपादन अंबाजोगाई येथील प्रसिद्ध कवी, व्याख्याते अविनाश भारती यांनी केले.

कन्नड शहरातील प्रसिद्ध उद्योजक,समाजसेवक मनोज पवार यांच्या वाढदिवसा निमित्त शहर व परिसरातील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांची उपस्थिती होती या कार्यक्रमास उद्योजक मनोज पवार यांच्या मातोश्री पुष्पाताई पवार,मनोज पवार यांच्या सुविद्य पत्नी सौ. उर्मीलाताई पवार, कमलेश भारती, बाळू बनकर,तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विठ्ठल शिरसे, जितु शिरसाठ यांची उपस्थिती होती. या प्रसंगी अविनाश भरती यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांचे प्रभोधन करतांना सांगितले की संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली तेंव्हा तेही सोळा वर्ष्यांचे होते. जीवन जगत असताना वेळेला खुप महत्व असते ज्याची वेळ चुकली त्याचे नुकसानच होते याचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांनी गरम चहा आणि बिस्कीट याचे उदाहरण दिले.या आपल्या मायबोली मराठी भाषेची खुबी सांगताना ते म्हणाले की, आपल्या भाषेत व्यक्त झाले तरच सर्वसामान्यांपर्यंत पोहचता येते, जो पर्यंत कविता जिवंत आहे तो पर्यंत मराठी भाषेला मरण नाही.

मनोज पवार यांच्या अंगी असल्याने कन्नडच्या राजकारणात त्यांचा नक्कीच उदय होईल अशा भावना मनोज पवार यांच्या प्रति व्यक्त करून त्यांनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला. कार्यक्रमाचा अद्यक्षीय समारोप करतांना सागर जाधव यांनी मनोज पवार यांना राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय,महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालय,साने गुरुजी विद्यालय,सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय,संत ज्ञानेश्वर विद्यालय, अजित दादा पवार उर्दू हायस्कूल, शिक्षण महर्षी के. के.जाधव विद्यालयाचे इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थी, शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विविध




शाळांमधील गरीब, होतकरू विदयार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले यात भारतीय संविधान, छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, छावा, एम.पी. जे.अब्दुल कलाम, महात्मा फुले आदीच्या पुस्तके यांचाही समावेश होता. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रवीण दाभाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाळू बनकर,जीतू शिरसाठ, संदेश पवार, प्रवीण घाटगे, महेश सोनवणे, संदीप घोंगटे, शुभम नागरे, राजेंद्र मोरे, सचिन काळे ,सागर काळे,सोमीनाथ दाभाडे, देवानंद घटूरसिंग, सौरभ शिंदे, कुणाल शिंदे, गजानन पाखरे, रणजित बसवडे, विकास बनकर, उत्कर्ष थोरात, इत्यांदीनी परिश्रम घेतले.

# वर्तमान युगातील अवतारी पुरुष : नरेंद्र मोदी



प्रा.डॉ.राम बुधवंत
भाजप प्रदेश प्रवक्ता, पॅनेलिस्ट

आधुनिक केसरी

भारतातील प्रत्येक नागरिकांचे स्वप्न साकार करणारे पंतप्रधान म्हणुन ज्यांचा उल्लेख केला जातो, नरेंद्र मोदी 2014 नंतर पंतप्रधान झाले म्हणुनच देशातील वर्षानुवर्षापासुन रखडलेले अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लागले. कदाचित पंतप्रधान ते नसते तर हे प्रश्न सुटले असते का? याची शंका वाटते. ज्यांनी सामान्य माणसाला सोबत घेवुन सबका साथ, सबका विकास या सुत्राचा अवलंब करीत विकासाची ओळख जनतेला करून दिली. मुलभुत गरजा शिवाय सर्व वर्गसमुहातील लोकांचा समान विकास त्याहुन अधिक समृद्धशाली देश आणि शेती विकासाला प्राधान्य एवढेच नाही हिंदुत्वाचं रक्षण याशिवाय लष्कराचे आधुनिकीकरण हे सारं करताना वयाची सत्तरी पार केलेले मोदी देशातील प्रत्येक नागरिकांच्या कल्याणासाठी रात्रीचा दिवस करून चोवीस तास कठोर परिश्रम घेणारा पंतप्रधान ही त्यांची ओळख. क्रयमान शक्तीतुन केवळ कागदोपत्री कार्य न ठेवता कृतीद्वारे काम करताना सामान्य जनतेच्या मनावर ज्या नेतृत्वाला जागा मिळाली असं नेतृत्व केवळ आपल्या देशात नव्हे तर जगाच्या पाठीवर सर्वाधिक लोकप्रियता मिळवणारं ठरलं. कधी कधी प्रश्न अनेकांच्या मनात येवुन जातात कदाचित मोदी हे पंतप्रधान नसते तर खरंच राम मंदिर असो किंवा 370 कलम असो हे प्रश्न मार्गी लागले असते का? वर्तमान राजकिय व्यवस्थेत त्यांच्या नेतृत्वाचा उदय खऱ्या अर्थाने देशातील प्रत्येक नागरिकाचे भाग्य म्हणावे लागेल. मागे वळुन पहाताना आठ वर्षात त्यांनी केलेल्या कामाचा आलेख नेत्रदीपक लोकांच्या डोळ्यासमोर आहे. त्यामुळे 2014 ला टाकलेला विश्वास 2019 मध्ये बहुमताने आणि 2024 लोकसभा 400 पार निश्चित यशाकडे गेल्याशिवाय रहाणार नाही. मोदी हे नेतृत्व म्हणजे वर्तमान युगातील अवतारीत पुरूष असं म्हटलं तर आश्चर्य वाटणार नाही.

भुतलावर साक्षात प्रभु रामचंद्राचा अवतार एका युगात होवुन गेला. पण ज्या आयोध्येत राम जन्मले इथे राम जन्मलेच नाही हा चारशे वर्षे वाद वर्तमान कलियुगात न्यायालय दरबारी पडला होता. अर्थात मताच्या राजकारणासाठी तत्कालीन व्यवस्थेने हे विषय लोंबकळत ठेवले. पण राम ही समस्त हिंदु बांधवाची आस्था आणि ऱ्हदयस्थ प्राण त्यासाठी देशात हिंदु बांधवांनी मग विश्व हिंदु परिषद असेल, बजरंग दल असेल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असेल एवढेच नाही तर भाजपानेसुद्धा कितीतरी आंदोलने, संघर्ष केला. पण छे, वेगवेगळ्या राजकिय व्यवस्थेने पद्धतशीरपणे हा विषय निकाली काढला नाही. पण असं म्हणतात, जेव्हा अधर्म आणि अन्यायाची परिसीमा गाठल्या जाते तिथे सत्यरूपी माणसं जन्म घेतात तोही एक कलियुगातील अवतारच म्हणावा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशाग्र नेतृत्वामुळे राम मंदिराचा प्रश्न एकदाचा निकाली निघाला आणि आयोध्येत भव्य दिव्य मंदिर उभारणीचे काम जोरात सुरू आहे. कदाचित उद्याच्या संक्रातीपर्यंत रामलल्ला मुर्ती प्रतिष्ठापना जन्मस्थळावर होईल. पण चारशे वर्षानंतर मोदीच्या नेतृत्वामुळे हे सारं झालं. हे सत्य कुणी नाकारू शकत नाही.

असाच एक प्रश्न जो भारतातील प्रत्येक नागरिकांच्या अस्मितेचा आणि राष्ट्रभक्तीचा विषय बनला होता. खरं म्हणजे आपल्या देशाची फाळणी असेल ती कुणामुळे झाली? जबाबदार कोण होतं? त्या काळात केवळ मताचं लांगुनचालन करण्यासाठी ज्या गोष्टी एखाद्या वर्गसमुहाच्या नेत्याने मागितल्या त्या सर्व आपल्याच देशातील तत्कालीन नेत्यांनी देवुन टाकल्या. काश्मिरमध्ये 370 कलम मुळात लावण्याची गरज नव्हती. त्याला काँग्रेस हाच जबाबदार असं म्हणायला हरकत नाही. पण हे कलम उखडुन काढण्यासाठी 75 वर्षे भाजप तथा हिंदु बांधवांना लढा द्यावा लागला. डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांचं बलिदान असेल किंवा भाजपाच्या अनेक थोर महापुरूषांनी दिलेला लढा असेल पण 370 रद्द केल्या गेलं नाही. त्यासाठी नरेंद्र मोदी हे नेतृत्व जन्माला येवु द्यावं लागलं. ज्यांनी संसदेत बहुमताने हे कलम रद्द केलं. नागरिकता संशोधन कायदा असेल त्या अंतर्गत वर्षानुवर्षे भारतात राहणाऱ्या लोकांना भारतीय नागरिकत्व प्रदान करणे असेल, काश्मिरमधील कलम रद्द केल्यानंतर स्वातंत्र्याच्या नंदनवनात जगायला संधी लोकांना मिळाली. नरेंद्र मोदी यांनी एका एका प्रश्नावर लक्ष घालताना देशाच्या सुरक्षेला प्राधान्य दिलं. शत्रु राष्ट्र त्याची जागा त्यांना दाखवुन दिली. आमच्या अंगणात याल तर याद राखा, आम्ही चांगले पण आहोत पण त्याहुन अधिक आमच्या हिताला जेव्हा बाधा येईल तेव्हा आम्ही सुतभर मागे हटणार नाहीत. भारतीय सेनेचं आधुनिकीकरण त्यांनी करून दाखवलं. नवनविन तंत्रज्ञानाचे शस्त्र जे कधीच व्यवस्थेने खरेदी केलेले नव्हते. लडाख, अरूणाचल सीमावर्ती भागामध्ये रस्त्याचे जाळे निर्माण केलं. 36 राफेल खरेदी विमानाची केली. एवढेच नाही तर करोडो रूपायाची आर्थिक तरतुद सुरक्षेच्या प्रश्नावर दरवर्षी ते बजेटमध्ये करतात. विक्रांतसारख्या जलावतरण रखडलं होतं ते त्यांनी करून दाखवलं. आपल्या सैनिकाच्या मनाचं धैर्य वाढवावं, त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी पगार वाढ असेल, वेळेवर पेंशन असेल, रखडलेली त्यांची कामे असतील एवढेच नाही तर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह अधुनमधुन सीमावर्ती भागाचा दौरा करतात. मध्यंतरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अचानक पाकिस्तानचा दौरा करून आम्ही मैत्रीही कशी करतो हा आदर्श दाखवुन दिला. वास्तविक पहाता विरोधकांनी टिका केली पण योग्य भुमिकेला जिथे राष्ट्रहिताची जोपासना होते तिथे हे नेतृत्व कधीच मागे हटलेले नाही. शेतकऱ्यांच्यासाठी किसान सन्मान योजना आणली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच अशी योजना राबवल्या गेली. आपल्या संसदेचे अद्ययावत संसद भवन असावं ज्याची उभारणी सद्या सुरू आहे. सर्वात चांगली गोष्ट मोदी सरकारने केली ती म्हणजे तीन तलाक कायदा झालाच नसता. करोनासारख्या संकटात मानवी जीवाची हानी होवु नये म्हणुन स्वतः पंतप्रधान मोदीजींनी हा विषय अत्यंत काळजीपुर्वक हाताळुन तब्बल दोन वर्षात देशात अत्याधुनिक आरोग्य सेवा उभारली. या



व्यतिरिक्त दुसरं नेतृत्व असतं तर आज याच देशातील लोकसंख्या अर्ध्यावर आली असती कारण संकट तेवढं भयानक होतं. करोना लसीचं उत्पादन आपल्याच देशात तयार करून आत्मनिर्भर हा प्रयोग यशस्वी केला. कमी कालावधीत 200 कोटीपेक्षा अधिक लसीचे डोस मोफत दिले. चिनाब ब्रिज, बुगी ब्रिज कदाचित झाला नसता. नॅशनल पोलीस मेमोरिअल झाले. अटल टनल हा बोगदा पुर्ण केला. सोलार ऊर्जेत आपला देश पुढे आहे. वंदे मातरम सारखी ट्रेन देशात सुरू केली. यमुना एक्सप्रेस वे व दिल्लीला रिंग रोड हे फार मोठे यश म्हणावे लागेल. विशेष म्हणजे ईडी आणि सीबीआय या केंद्र सरकारच्या गुप्तचर संस्था इतक्या कार्यक्षम असतात हा अनुभव केवळ मोदी यांच्या नेतृत्वात देशवासियांना आला. ज्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसला. काळा पैसा बाळगणारे उघडे पडले. नवोदय विद्यालयाला तमसो मा ज्योतिर्गमय हा टॅग मिळाला. एक महत्वाची गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय योग दिन ज्याची सुरूवात भारताने केली. अनेक प्रसंगी पाकिस्तानला पराभुत करून जगापासुन वेगळं पाडण्यात आलं. वन रँक वन पेंशन, रेल्वेचे आधुनिकीकरण कदाचित या वेगाने झाले नसते. एअरपोर्टसारखी रेल्वे स्टेशन या काळात झाली. एक निशान, एक प्रधान, एक संविधान हे काश्मिरमध्ये आज पहायला मिळतं. हिंदु धर्मात जनजागरण मोठ्या प्रमाणावर उत्सव हे केवळ मोदी यांच्या नेतृत्वामुळेच. मेक इन इंडिया हा प्रयोग त्यांनी चालु केला. आत्मनिर्भर सारखी कल्पना अंमलात आली नसती. स्टार्ट अप भारत एवढेच नाही एन 95 मास्क आणि पीपी किट याचा निर्यात म्हणुन देश पुढे आला. करोनासारख्या संकटात ऑक्सीजन एक्सप्रेस विमानानेसुद्धा पुरवठा झाला. युक्रेनमध्ये आडकलेली 30,000 भारतीय मुलं सुखरूप परत आणली, जनधन योजना, उज्वला गॅस, खेड्यापाड्यांना वीज, मोफत शौचालय, बुलेट ट्रेन, ज्ञानव्यापी मथुरा प्रकरण यातही विशेष लक्ष घातले.

खासदार-आमदारांच्या गाडीवरचे लाल दिवे बंद झाले. खादीचा आग्रह त्यामुळे उद्योगाला संजीवनी मिळाली. काशी विश्वनाथ कॉरीडॉर झाला. नमामी गंगे गंगा सफाई, सागरमाला प्रोजेक्ट, आणि सहकार मंत्रालय केंद्राने स्थापन केलं. मोदीजींनी आवाहन केल्यानंतर गॅस सबसिडी लोकांनी सोडली. योग्य ते लोकांना पद्म आणि पद्मविभुषण पुरस्कार देण्याची सुरूवात झाली. खेळाडूंना प्रोत्साहन, आर्थिक सहकार्य एवढेच नाही तर त्यांच्याशी संवाद हे मोदींनी चालु केले. अशा असंख्य योजना ज्याचा संबंध देश हित, जनकल्याण आणि अंत्योदय अर्थात पंडित दिनदयाळ उपाध्याय यांनी दाखवुन दिलेल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आठ वर्षात या सर्व पार्श्वभुमीवर केलेलं काम ज्यामुळे जनतेचा विश्वास या नेतृत्वावर प्रचंड वाढला. आबकी बार, चारसो पार हे आता विरोधकांनी पण ओळखलं. म्हणुन देशातील सर्वसामान्य माणसांना एकच नेतृत्व नरेंद्र मोदी याशिवाय दुसरा विषय दिसत नाही.

# एकमेवाद्वितीय 'नरेंद्र मोदी'

आधुनिक केसरी

जागतिक उंचीचे आदर्श व्यक्तीमत्व कमावलेले आपले मा.पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या 17 सप्टेंबर रोजी येणाऱ्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याबद्दल प्रकट केलेली कृतज्ञता...!! देशाचं उच्चस्तरीय नेतृत्व आणि संघटना यांनी राष्ट्रीय भूमिकेतून काही योजना आखल्या व त्या पूर्णपणे यशस्वी झाल्या तर काय निष्पन्न होते याचा अनुभव आपण सारे भारतीय गेल्या आठ वर्षापासून अनुभवत आहोत. आपल्याकडे सरकार व सामान्य जनता यामध्ये कमालीचा समन्वयाचा अभाव होता. स्वातंत्र्याची षष्ट्यब्दी झाली तरी 2014 पर्यंतच्या लोकसभेच्या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी 50 ते 55 च्या पुढे जात नव्हती. परंतु माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात 2014च्या लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय झाला आणि मोदीजींच्या नेतृत्वाची छाप सामान्य माणसाच्या मनात विश्वासाची झाली होती. त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीच्या मतदानात दिसून आला. 2014 च्या लोकसभा निवडणूक निकालानंतर मतदानाचा उच्चांक वाढलेला आपल्याला दिसला.

मतदान कुठे 60 टक्के, कुठे 65%, कुठे 68 कुठे 70 तर अगदी कुठे कुठे 75 टक्के पर्यंत झालेले जाणवते. त्यापूर्वीच्या सरकार मधील सत्ताधाऱ्यांचे भ्रष्टाचाराचे वाढलेले उच्चांक, अतिरेकी संघटना व त्यांच्या वाढलेल्या दहशतवादी कारवाया, सांस्कृतिक मूल्यांच्या...अस्मितेच्या लढाया, राजकारणाचं वाढलेले गुन्हेगारीकरण यामध्ये काही सुधारणा होत नाहीत. याचा सर्वंकष परिणाम म्हणून जनतेमध्ये मतदारांमध्ये एक नैराश्याची भावना वाढीस लागली होती. परंतु 2014 च्या लोकसभेच्या निवडणुकीत सरकारच्या नेतृत्वावर विश्वास मतदानातून व्यक्त झाला. एकूणच सर्व स्तरावर चैतन्य निर्माण झाले..!

गेल्या 3 तपातील लोकसभा निवडणुकीतील मतदान टक्केवारीकडे पाहिले तरी आपल्याला हे मान्य करावे लागेल.

आणीबाणी लादल्याच्या पार्श्वभूमीवर जनता पक्षाची राजवट आली अगदी त्यावेळी 1977 ला 60.49% मतदान झाले होते.1980 च्या लोकसभा निवडणुकीत 56.92%, स्व. इंदिराजी गांधी यांच्या हत्त्येच्या सहानुभूतीच्या लाटेतही 1984 च्या लोकसभा निवडणुकीत 64.01%, 1989 ला मि. क्लीनची धुलाई करत 61.95% , स्व.राजीव गांधींच्या हत्त्येनंतरच्या 1991 ला 56.73% मतदान झाले होते.1996 ला 57.94%, 1998 ला 61.97% , 1999 ला 59.99% , 2004 ला 58.07% , 2009 ला 58.21%, 2014 ला 66.44% व 2019 ला 67.40% .

आपल्या देशाच्या पंतप्रधान असलेल्या व्यक्तीचा दिनक्रम किती आदर्श आहे याचा वस्तुपाठ एक विवेकसंपन्न व्यक्ती म्हणून माननीय नरेंद्र मोदींनी दाखवून दिला.

व्यायाम, प्राणायाम, कमालीची शिस्तप्रियता, राजकीय प्रतिनिधींनी जनतेप्रती, मतदारांच्या प्रती किती जाणीवपूर्वक व्यवहार केला पाहिजे याचा मापदंडच जणू त्यांनी सर्व राजकीय धुरीणांना घालून दिला व आचरणात आणण्यासाठी प्रवृत्त केले. त्याचा एक महत्त्वाचा परिणाम दरवर्षीच्या 21 जूनच्या जागतिक योग दिनात झाला.देशाबाहेरील प्रवासात ठायी ठायी आपले भारतीयत्व किती मूल्यवान, उच्च कोटीचे आहे हे जाणवून दिले. परदेश दौऱ्यामध्ये आज पावेतो अनाठाई असलेली पीत पत्रकारिता बंद करण्याचे धाडस दाखवले.यापूर्वी परदेशी पाहुण्यांना केवळ ताजमहालाची प्रतिकृती म्हणजे भारतीयत्व माहीत होते. पण श्रीमद् भागवत गीता म्हणजे भारतीयत्व हे जाणवून देणे ही बाब व त्याचबरोबर भारतीय खाद्यपदार्थांची लज्जत प्रकर्षाने जाणवून देणे हे मोदीजींनी जाणीवपूर्वक केले.

घटनेचे 370 कलम रद्द करून राष्ट्रीय एकात्मतेला सन्मान मिळवून दिला. आणि त्या अनुषंगाने जम्मू-काश्मीरमधील राजकारणातील व राजकारणाबाहेरील भारतीयत्वाच्या शत्रूंचा पूर्णपणे निःपात केला.देशात सर्व क्षेत्रात जे काळ्या पैशाने थैमान घातले आहे त्याविरुद्ध मोठी मोहीम उघडून भ्रष्टाचा-यांची यापुढे गय केली जाणार नाही हा विश्वास सामान्य माणसापुढे निर्माण झाला.देशातील देशप्रेमी जनतेच्या मनात "मोदी है तो मुमकिन



है" असा दृढ विश्वास निर्माण झाला.हा देश त्यांच्या नेतृत्वात सुरक्षित व सामर्थ्यवान होईल हा विश्वास वाढीस लागला.

देशातील जनतेने 1972 साली देशाच्या पंतप्रधानांनी स्वतःच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी सत्तेच्या पदाचा दुरुपयोग करून निवडणुकीत गैरमार्गाने विजय मिळवताना आणि भारतीय लोकशाहीचे धिंडवडे निघतांना स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव अनुभवला.

1997 साली माननीय अटल बिहारी बाजपेयी यांच्यासारख्या प्रगल्भ नेतृत्वाला पंतप्रधानपदी आरुढ होण्याची संधी देण्याऐवजी... आय.के. गुजराल व एच.डी.देवेगौडा यांना पंतप्रधान करून लोकशाहीचा बट्ट्याबोळ करताना स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव अनुभवलाआणि आता माननीय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या नेतृत्वात संपन्न लोकशाहीतील पराक्रमी प्रगतिशील भारतीय स्वातंत्र्यदिनाचा अमृत महोत्सवी काळ आपण अनुभवत आहोत. या 2022 च्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात माननीय मोदींनी अनेकविध विचारांचं जे मौलिक विचार दर्शन जनतेसमोर मांडले.त्यामध्ये करोडो करोडो भारतीयांनी अमृत कालिन पर्वात भविष्यातील भारतासाठी पुढच्या पिढ्यांसाठी अमृत काल के पंचप्रण यामध्ये जे 5 संकल्प मांडले. त्यामध्ये पहिला प्रण/संकल्प आहे. अपनी विरासत पर गर्व देशात व देशाबाहेर, समाजात या विषयाचे चिंतन, मनन अधिक सुस्पष्ट व व्यापक स्वरूपात मांडण्याचा व आचरणात आणण्याचा संकल्प आपण सगळ्यांनी करायला हवा. यामध्ये भारताच्या प्राचीन परंपरा संस्कृती आध्यात्मिकता म्हणजे वेद, उपनिषदे, आयुर्वेद, रामायण, महाभारत, श्रीमद्भागवतगीता त्याचप्रमाणे केदारनाथ, अयोध्येतील श्रीराम मंदिर, मथुरेतील कृष्ण मंदिर या व अशा अनेक अस्मितेच्या गोष्टीबद्दल अभिमान बाळगला पाहिजे.

दुसरा प्रण/संकल्प आहे -- "विकसित भारत का लक्ष्य" यामध्ये कितीतरी विषय आहेत. देशामध्ये रस्ते, महामार्ग, रेल्वेमार्ग, पूल, बोगदे यांची प्रचंड प्रमाणात कामे सुरू आहेत.कोरोनाच्या अतिकठीण काळात आपण बनवलेले व्हॅक्सिन देशाबाहेर त्वरित विमानसेवेने मदतकार्य म्हणून पाठवले.सरंक्षण सामग्रीमधील निर्मितीमध्ये आपण स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने आगेकूच करत करत इस्रो द्वारे अंतराळ मोहीम यशस्वी करत आहोत. हे यामध्ये प्रतिकात्मक म्हणून विचार करता येईल.

तिसरा प्रण/संकल्प आहे -- "गुलामी के हर अंश से मुक्ती."राष्ट्रीय, राजकीय गुलामगिरीसह समाजातल्या अनेक क्षेत्रात मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी आपण जे प्रयत्न केले. ज्या योजना आणल्या त्यामध्ये अतिसामान्य, रस्त्यावरच्या छोट्या व्यावसायिकाला खाजगी सावकाराच्या पाशातून सोडवून त्याला स्वाभिमानी, स्वयंपूर्ण बनवण्यासाठीच्या अनेक योजना सुरू केल्या. स्त्रीभ्रूण हत्येच्या मानसिकतेला... स्त्री सन्मान जागवण्यासाठी "बेटी बचाव बेटी पढाव" सह अनेक योजना सुरू केल्या. मुस्लिम भगिनींची पाशवी अत्याचारातून मुक्ती होण्यासाठी तीन तलाक वर बंदीचा निर्णय, तसेच कुपोषण व बालमजुरी टाळण्यासाठी मुलांच्या शैक्षणिक सवलतीसह योजना व त्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण इ. संक्षिप्त स्वरूपात सांगता येईल.

चौथा प्रण/संकल्प -- "नागरिकों मे कर्तव्य की भावना"समाजाप्रति, राष्ट्राप्रति नागरिकांच्या कर्तव्यभावना वाढीस लागणे भविष्यातील पिढ्यांसाठी आवश्यक आहे. हे पर्यावरणाचे महत्त्व व गांभीर्य ओळखून वृक्षारोपण मोहीम, पाणी व्यवस्थापन मोहीम, प्लॅस्टिक कचरा निर्मूलन जनजागृती मोहीम, नागरिकांनी वेळेवर योग्य ते सरकारी कर भरावेत तसेच सुरळीत व सुरक्षित वाहतूक यंत्रणेमध्ये सिग्नल पाळणे यासारखी अनेक सामाजिक कर्तव्ये आहेत. याची मोठी यादी आठवता येईल.

पांचवा प्रण/संकल्प आहे -- "एकता और एकजूटता"यामध्येही हा विषय अनेक अंगांनी चर्चेत घेता येईल परंतु अगदी संक्षिप्त स्वरूपात सांगायचे झाले तर सामुहिक संगणक साक्षरता मोहीम किंवा आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा व एकजुटतेचे प्रतिक म्हणून पंढरपूरची आपल्या दिंडीचा उल्लेख करता येईल.

याशिवाय या अमृत महोत्सवी वर्षातल्या आणखी दोन महत्त्वाच्या विषयांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. " भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या कालावधीतील अत्युच्च पदावरील सामाजिक क्रांती...!! २०१७ ते २०२२ या कालावधीतील मा.राष्ट्रपती श्री.रामनाथजी कोविंद व २०२२ ला त्यांनी शपथ दिलेल्या नवनिर्वाचित मा.राष्ट्रपती महोदया श्रीमती द्रौपदी मुर्मू तसेच उपराष्ट्रपतीपदी मा.व्यंकय्या नायडूंच्या नंतर विराजमान झाले आहेत मा.जगदीशजी धनखड.

नव्याने भारतीय संसदेची ओळख ज्यामुळे जगाला होईल ते नवीन संसद भवन.. सेंट्रल व्हिस्टा..! ही आपली स्वाभिमानाचा मानदंड ठरणारी कामगिरी ठरणार आहे...!!आणि २८ ऑगस्टच्या "मन की बात" मध्ये ज्या विविध विषयांवर मा.पंतप्रधानांनी चर्चा केली त्यामध्ये "मिलेट" या भारतीय पोषण आहारातील कांही मुख्य धान्ये व त्यांचे पदार्थांचा उल्लेख केला. पाश्चात्य पाहुण्यांनासुद्धा मोह होतो अशा अनेक भारतीय पदार्थांची जगाला ओळख करून देण्यासाठी २०२३ ला "आंतरराष्ट्रीय पोषण अनाज वर्ष" International millets Year यातील आपली देशातील व देशाबाहेरील सहभागीता ही एक क्रांतिकारी घटना असेल. असा विश्वास दिला आहे. या अशा वैश्विक परिघातील चिंतनशील व्यक्तीमत्वाचे दर्शन देणाऱ्या श्रद्धेय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदींना दीर्घ आयुरारोग्य व समाधान लाभावे. ही त्या विश्वविधात्याकडे प्रार्थना..!

-लक्ष्मण वासुदेव सावजी
लेखक हे भारतीय जनता पार्टीचे चर्चा प्रतिनिधी

# कायगाव परिसरात डेंग्यूचा रुग्ण; आरोग्य विभाग हाय अलर्टवर

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल झिंजूर्डे पाटील**

**गंगापूर :** कायगाव (ता.गंगापूर) परिसरात सोमवार दि 12 रोजी डेंग्यूचा पहिला रुग्ण अढल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेने स्थानिक आरोग्य विभाग खडबडून जागे झाले असून उपाय योजनांच्या बांधणीसाठी धावपळ सुरू झाली आहे.सततच्या पावसामुळे रस्त्यावर व नाल्यांमध्ये तसेच डपक्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे हा आजार बळकवण्याची शक्यता असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.कायगाव येथे डेंग्यू चा रुग्ण आढल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि 12 रोजी अढलेल्या रुग्णाला शासकीय आरोग्या विभागाणे सदृश्य डेंग्यू रुग्ण म्हंटले आहे तर खाजगी ल्याबने या रुग्णाला कन्फम घोषित केले आहे या मुळे शासकीय यंत्रणा व खाजगी ल्याबमध्ये चांगलीच तफावत असल्याचे दिसून आले आहे. या मुळे नागरिकांमध्ये एक वेगळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**घ्यावयाची दक्षता**

1 घरातील पाणी साठवण्याची भांडी 2 ते 3 दिवसाला स्वच्छ करून घ्यावी. 2 पाणी साठवण्याच्या भांड्याचे तोंड व्यवस्थित झाकणे किंवा घट्ट कपड्याने बांधणे. 3 आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळने.4 फ्रीज अथवा कुलरचे पाणी वेळोवेळी काढून टाकने.5 मच्छरदाणी चा वापर करणे तसेच किडक्यांना जाळ्या बसविणे.6 संडासच्या पाईपला जाळी बसविणे.7 छतावरील पाणी, भंगाराच्या वस्तू,टायर,नारळाच्या करवंट्या,यांची योग्य विल्हेवाट लावणे. 8 घराभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे.9 कोणताही ताप अंगावर न काढता जवळच्या डॉक्टरशी संपर्क साधने.



**सदरील रुग्ण हा डेंग्यू सद्दश्य आहे आणि स्थानिक पातळीवर उपाय योजना राबल्या जात असून सर्व्हे चालू केला आहे.स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाला देखील या संदर्भात कळवले आहे. प्रत्येक घरातील पाणीसाठा तपासल्या जात असून अँबेटिंग केमिकल चा वापर केला जात आहे.**

**- डॉ. नारोडे, वैद्यकीय अधिकारी**

**कायगाव येथे अढलेल्या रुग्णाची कंडिशन ही व्यवस्थित असून आमच्या संपर्कात आहे. नागरिकांनी घाबरून न जाता स्वतःची काळजी घ्यावी. आमच्या कडून स्थानिक पातळीवर जनजागृती तसेच उपाय योजना सुरू आहे. ग्रामपंचायतला पत्र देऊन धुरू फवारणी तसेच अधिक उपाय योजना आम्ही सुरू केल्या आहेत.**

**-बी. बी. कापसे, आरोग्य सेवक**

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजनासाठी जिल्हा प्रशासनाला निवेदन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आरोग्य यंत्रणेमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कामगारांना पुनर्च सेवेत सेवेत सामावून घेण्यात यावे, व अंशकालीन कर्मचारी घोषित करून शासनाच्या विविध विभागातील जागा कोरोना कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात, यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी आज कंत्राटी कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालसमोर निदर्शने करून आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.. राज्यात कोरोनाचे संकट वाढत असताना आरोग्य विभागाने संपूर्ण राज्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती केली. कोरोनासारख्या महामारीत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी राज्याच्या आरोग्य विभागात स्वतःचा जीव धोक्यात घालून रुग्णसेवा दिली. अशा परिस्थितीत कोरोनाचा वाढत्या प्रादुर्भावात गावातील लोकांनी व नातेवाईकांनी तुच्छ वागणूक दिली, कठीण काळात कर्तव्य बजावले, ज्या कोरोनाच्या परिस्थितीत सखे नातेवाईक आपल्या रुग्णांना बेवारस स्थितीत सोडून जात होते अशांना सेवा व आधार देण्याचं काम धुळे येथील हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात ठेका पद्धतीने काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी केले या कर्मचाऱ्यांना मोठ्या वाजा गाजाने कोरोना योद्धा म्हणूनही सन्मानित करण्यात आले. मात्र जसजशी कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात आली तेव्हा या सर्व कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले आज सर्व कर्मचाऱ्यांवर कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे वेळोवेळी पाठपुरावा करूनही शासन दुर्लक्ष करत आहे .. सध्या स्थितीत हिरे मेडिकल कॉलेजच्या रुग्णालयात 71 पदे रिक्त आहेत या पदावर आमचा विचार करावा आमच्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात यावे आरोग्य विभागातील रिक्त पदी नेमणूक करून कायमस्वरुपी किंवा एनएचएम रोजगाराची संधी उपलबध करून द्यावी, अशा आदी मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी प्रशासनाला कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिल आहे.सदर निवेदन देणाऱ्या कर्मचारी स्वप्निल येदवर , आकाश सोनवणे,विठ्ठल पाटील,निलेश पाटील फिरोज शैख, भूषण पाटील, दिनेश पठारे, सुशील पवार, समाधान बागुल, मनोहर खैरनार, मयूर खाटीक, मनीषा खामगड, उज्वल मोरे, राकेश वाघ, उमेश मोरे, महेश खैरनार, निलेश कुंभारे, संदीप सोनावणे, राखी मोरे उपस्तित होते.

# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : बदलांची नांदी : प्रा. जायभाये

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात कार्यरत असलेले महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते, विचारवंत, लेखक, कवी प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये दिनांक 14 सप्टेंबर 2022 रोजी पाथरी येथील स्व.नितीन (वरिष्ठ) महाविद्यालयात आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रमांतर्गत आयोजित एक दिवशीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. एस. फुने यांच्यासह डॉ. मारुती खेडेकर, डॉ.अर्चना बदने, डॉ.एस.पी. गायकवाड, डॉ.जगन्नाथ बोचरे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी डॉ.जायभाये यांनी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, त्यातील पूर्वप्राथमिक ते पीएच.डी. पर्यंतच्या बदलत्या बाबींचा सखोल



आढावा घेतांना शालेय, उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात कोणते आमूलाग्र बदल घडून येणार आहेत ( ?) यावर सखोल मार्गदर्शन केले. हे बदलते शिक्षण धोरण विद्यार्थी-पालक, संस्था चालक आणि शिक्षक-प्राध्यापक यांना अनेक आव्हाने उभी करणार असून येणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी वरील सर्वच घटकांनी तयार रहावे लागेल असा गर्भित इशारा दिला. तसेच ह्या शिक्षण प्रणालीची अंमलबजावणी करतांना ग्रामीण स्तरावरील शाळा-महाविद्यालय आणि शिक्षण संस्थांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागणार आहे असे सूतोवाच केले. याप्रसंगी डॉ.खेडेकर सरांनी मुलांना NEP वर मार्गदर्शन केले, तसेच अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ.फुने यांनी बदल स्वीकारण्यासाठी सर्वांनी तयार रहावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन डॉ.बदने मॅम यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय आणि आभार डॉ.गायकवाड मॅम यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. सोळंके सर, डॉ. गिराम मॅम, प्रा. ठाकूर सर, प्रा.पवार सर, प्रा.लहाने सर आदी प्राध्यापक मंडळींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# देशी गावठी कट्टा विकणाऱ्याच्या आवळल्या मुसक्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, विजय पांडुरंग माळी हा त्याचे कब्ज्यात देशी बनावटीचा गावठी कटटा विक्री करण्याच्या उद्येशाने सोबत बाळगुन धुळे येथे आला असुन साक्री रोडवरील जे.के. ठाकरे चौकाचे पुढे रस्त्यावर उभा आहे. अशी माहिती प्राप्त झ आल्याने सदर इसमाचा शोध घेवुन वातमीची खात्री करुन योग्य ती कारवाई करणे बाबत पोलीस निरीक्षक श्री . हेमंत पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदारांना आदेशीत केले होते . त्याअनुषंगाने पथक रवाना होवुन सदर संशयीत इसम नामे विजय पांडुरंग माळी याचा शोध घेत असता तो साक्री रोडवरील जे . के . ठाकरे चौकाचे पुढे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याची कसुन विचारपुस केली असता, तो उडवा - उडवीचे उत्तरे देत असल्याने त्याचा संशय आल्याने त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला पिस्टल मॅगझीनसह (गावठी कटटा ) मिळुन आले. त्याचे वर्णन १ ) २०,००० / - रु . किं.चा एक गावटी बनावटीचे पिस्टल ( गावठी कट्टा ) स्टील बॉडी असलेला. असा एकुण २०,००० / - रु . किंमतीचा वरील वर्णनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे . इसम विजय पांडुरंग माळी याचे विरुध्द पोकॉ / १६७२ सागर सुभाष शिर्के नेम . स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांचे खबरीवरुन धुळे शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)




डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग - ०४

आधुनिक केसरी

हनिमूनला जाण्याआधी अनेकांना विविध लैगिक समस्या असतात. त्यासाठी त्यांनी कशी आणि काय काळजी घ्यावी ?

**फायमोसिस :** यामध्ये पुरुषांची समोरची स्किन ही टाईट स्वरुपाची असते. ती मागे जात नसल्यामुळे वेदना होतात व ते आनंद घेऊ शकत नाहीत अशांनी हनिमूनला जाण्यापूर्वीच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार करुन घ्यावेत. अनेकांना कमजोरी, शीघ्रपतनसारख्या समस्या असतात. यावरही चांगले उपाय असून योग्य औषधे गोळ्यांनी यांनी ही समस्या दूर करता येते.

**पहिली रात्र : समज - गैरसमज**

पहिल्यारा रात्रीबद्दल भारतीय समाजामध्ये पहिल्यापासून भ्रामक समजुती आहेत.

पहिल्या रात्री स्त्रीला ब्लीडिंग झाले तरच ती व्हर्जिन आहे असा एक मोठा गैरसमज आहे. आपण त्याबद्दल विस्तृत माहिती घेऊ.

**हायमेन म्हणजे काय ? :** स्त्रीचे बाह्यअंग जिथे बाहेर उघडते तिथे एक
मांसल पडदा असतो. याला मध्यभागी एक गोल किंवा अंडाकृती आकाराचे
छिद्र असते ज्यामधून मासिक पाळीचा रक्तस्त्राव होतो.

* इन्टेक्स हायमेन' हे व्हर्जिनिटी सांगते असा गैरसमज समाजामध्ये आहे मात्र
सध्याच्या काळता तो पूर्णपणे चुकीचा आहे.
* संबंध करताना लिंगाच्या कठोरतेमुळे हा पडदा ब्रेक होतो. यामुळे मुलीला तात्पुरता त्रास किंवा रक्तस्त्राव होतो.
* जर हा स्त्राव थांबला नाही तर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
* काही मुलींमध्ये हा त्रास किंवा रक्तस्त्राव दिसत नाही जे की पूर्णपणे नैसर्गिक आहे.
* इतर गोष्टींमुळे देखील हे हायमेन ब्रेक होऊ शकते. ज्याला डिफ्लोरिंग ऑफ VAGINA असे म्हणतात.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com